दैनिक
हिंदू प्रकाशवार्ता
epaper.hinduprakashwarta.com
Web portal : hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

केतन अग्रवाल हत्या प्रकरणात उज्ज्वल निकम यांची नियुक्ती

पुणे: पुण्यातील रिअल इस्टेट व्यावसायिक केतन अग्रवाल हत्या प्रकरणात ज्येष्ठ वकील उज्ज्वल निकम यांची विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. केतनचे वडील विशाल अग्रवाल यांनी मुलाच्या हत्येप्रकरणी निकम यांची नियुक्ती करण्याची मागणी केली होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ही मागणी मान्य केल्यानंतर संबंधित विभागाला आवश्यक निर्देश देण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

पाण्याचा ताळेबंद मांडणारे हिवरे बाजार देशात पहिले

नगर (प्रतिनिधी) : आदर्श गाव हिवरे बाजार येथे नवरात्रोत्सवाच्या सातव्या माळेनिमित्त मुंबादेवी मंदिरात झालेल्या ग्रामसभेत सन 2026-27 चा पाण्याचा ताळेबंद सादर करण्यात आला. नवरात्रोत्सवात पाण्याचा ताळेबंद मांडण्याची परंपरा गावाने सलग 22 व्या वर्षीही कायम ठेवली. यावेळी बोलताना अहिल्यानगरचे धर्मादाय उपायुक्त नवनाथ जगताप यांनी, पावसाचा हिशेब मांडून त्यानुसार पाण्याचे नियोजन करणारे हिवरे बाजार हे देशातील पहिले गाव असल्याचे प्रतिपादन केले.

छत्रपती संभाजीनगर ❀ सोमवार, दि. १९ ऑक्टोबर २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : १७८ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com ❀ Postal Regn. No. ABD/551/2026-2028

थोडक्यात वार्ता

मलाबार गोल्ड एंड डायमंड्सचा विस्तार अधिक मजबूत

अहिल्यानगर : जगातील चौथ्या क्रमांकाचा सर्वात मोठा ज्वेलरी रिटेल ब्रँड आणि 'द रिस्पॉन्सिबल ज्वेलर' म्हणून ओळख असलेल्या मलाबार गोल्ड एंड डायमंड्सने महाराष्ट्रातील अहिल्यानगर येथील आपल्या शोरूमचा नव्याने शुभारंभ केला आहे. या माध्यमातून कंपनीने या परिसरातील आपली रिटेल उपस्थिती अधिक मजबूत केली आहे.५,६३२ चौरस फूट क्षेत्रफळात विस्तारलेल्या या शोरूममध्ये गोल्ड, डायमंड्स, प्लैटिनम आणि सिल्वर दागिन्यांचा खास संग्रह उपलब्ध आहे. विविध प्रसंग, आवडी आणि ग्राहकांच्या गरजा लक्षात घेऊन येथे दागिन्यांच्या विविध आकर्षक डिझाइन्स सादर करण्यात आल्या आहेत. मलाबार गोल्ड एंड डायमंड्सच्या रिटेल मानकांनुसार या शोरूमची रचना करण्यात आली असून, ग्राहकांना दागिन्यांची खरेदी करताना आरामदायी आणि आनंददायी अनुभव मिळेल, याची काळजी घेण्यात आली आहे.

महाराष्ट्रातील क्लिनिकल रिसर्च परिसंस्था बळकट

मुंबई : इंडियन सोसाइटी फॉर क्लिनिकल रिसर्च आणि सेंटर फॉर हेल्थ एप्लाइड नॉलेज एंड रिसर्च ऑटोनॉमी यांनी महाराष्ट्रभर जबाबदार, नैतिक आणि उच्च-गुणवत्तेची क्लिनिकल रिसर्च क्षमता बळकट करण्यासाठी सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली आहे. बीसीजी आणि हेल्थकोइस यांच्या जुलै 2026 मधील बिल्ट ऑन स्केल, टुरनिंग टू सायन्स या अहवालानुसार, भारतातील लाइफ सायन्सेस नवोन्मेष परिसंस्थेला गती मिळत आहे. गेल्या दशकात भारतात 10 हून अधिक नवीन औषध ॲसेट्स विकसित झाले असून, नवोन्मेषाची पाइपलाइन सुमारे 1.5 पटीने विस्तारली आहे. मात्र, भारताची लोकसंख्या आणि रोगभार यांच्या तुलनेत क्लिनिकल रिसर्चमधील भारताचा सहभाग अजूनही तुलनेने कमी आहे.

सॅमसंगकडून 'बिग, बिगर, बिगेस्ट' सेलिब्रेशनची घोषणा

गुरुग्राम - सॅमसंग इंडियाने आज 'बिग, बिगर, बिगेस्ट' मोहिमेची घोषणा केली, ज्यासह ग्राहकांना यंदा सणासुदीच्या काळात व्हिजन एआय-सक्षम मोठ्या स्क्रिन आकाराच्या टीव्हींच्या श्रेणीवर आकर्षक ऑफर्सचा आनंद घेता येईल. सण-उत्सवाचा उत्साह, कौटुंबिक मेळावे आणि एकत्र घालवलेल्या संध्याकाळच्या संकल्पनेवर आधारित ही मोहीम ग्राहकांना अधिक उत्साहवर्धक अनुभव घेण्यासाठी सॅमसंगच्या अत्याधुनिक एआय-सक्षम टेलिव्हिजनवर अपग्रेड करणे अधिक सुलभ बनवते.या फेस्टिव्ह ऑफर्सचा भाग म्हणून निवडक सॅमसंग टीव्ही खरेदी करणाऱ्या ग्राहकांना १,१०,९९० रुपयांपर्यंत मोफत सॅमसंग साउंडबार किंवा १,५९,९९० रुपयांपर्यंत मोफत सॅमसंग व्हिजन एआय टीव्ही मिळू शकतो. या ऑफरमध्ये २० टक्क्यांपर्यंत कॅशबॅक, झिरो डाऊन पेमेंटचे पर्याय आणि ३ वर्षांची सर्वसमावेशक वॉरंटी यांचाही समावेश आहे, ज्यामुळे ग्राहकांना या सणासुदीच्या काळात त्यांचा घरातील मनोरंजनाचा अनुभव अपग्रेड करणे अधिक सुलभ होते.

'हेल्दी बेबी कॉन्टेस्ट' उपक्रम

महाराष्ट्र, ऑक्टोबर २०२६: हिमालया बेबीकेअरने स्माइल फाउंडेशनच्या सहकार्याने महाराष्ट्रातील सीएचसी, औरंगाबाद येथे 'हेल्दी बेबी कॉन्टेस्ट'चे आयोजन केले. या उपक्रमात समुदाय-स्तरीय आरोग्य जनजागृती उपक्रम आणि संवादांच्या माध्यमातून 85 हून अधिक माता आणि बाळांना सहभागी करून घेण्यात आले. या उपक्रमातून माता आणि बालकांचे आरोग्य चांगले राहावे, तसेच लहान मुलांची योग्य वाढ आणि विकास होण्यासाठी काय काळजी घ्यावी, याबाबत जनजागृती करण्याच्या दोन्ही संस्थांच्या प्रयत्नांना बळ मिळाले. 7 ऑगस्ट 2026 रोजी सीएचसी, औरंगाबाद येथे हेल्दी बेबी कॉन्टेस्ट'चे आयोजन करण्यात आले होते.



डॉ. निष्काळजीपणामुळे महिलेचा मृत्यू डॉ.व्यंकटेशदुबेवार सह दोघांवर गुन्हा दाखल

न्यायालयाच्या आदेशानंतर कारवाई; शहरातील पांडुरंग हॉस्पिटल मधील घटना

हिंदू प्रकाश वार्ता/अशोक पवार

परभणी**पीडित महिला उपचारासाठी हॉस्पिटलमध्ये दाखल झाले असताना त्या महिलेचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याप्रकरणी परभणी शहरातील पांडुरंग हॉस्पिटल मधील तीन नामांकित डॉक्टर विरोधात नवा मोंढा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अधिक माहितीनुसार या प्रकरणी डॉव्यंकटेश डुबेवार डॉ. व्यंकटेश हराळे डॉ. सागर चेउलवारयांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक खंदारे करत आहेत फिर्यादी भाऊसाहेब पंडित झोल यांच्या तक्रारीनुसार त्यांची आई निलावतीबाई पांडुरंग झोल यांच्या छातीत दुखत असल्याने 7 मार्च 2023 रोजी त्यांना पांडुरंग हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते या मध्ये ईसीजी आणि टू डी इको तपासणीनंतर एन्जिओग्राफी करण्याची आवश्यकता असल्याचे डॉक्टरने सांगितले व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेतून उपचार केले जातील आणि रुग्णाच्या नातेवाईकांना पैसे भरावे लागणार नाहीत असे सांगण्यात आल्याचा दावा फिर्यादीने केला आहे मात्र या योजना मंजूर होईपर्यंत 60000 रुपये भरण्यास सांगून ही रक्कम घेतल्याची तक्रारीत



नमूद केली आहे एन्जिओग्राफीमध्ये रक्तवाहिनीतील ब्लॉकेज काढल्यानंतर एन्जिओप्लास्टीकरण्यास सुरुवात करण्यात आली सुरुवातीला डाव्या हाताच्या जमिनीतून प्रक्रिया करण्याचा प्रयत्न झाला. मात्र तो यशस्वी न झाल्याची माहिती आपल्याला देण्यात आली असा आरोप फिर्यादीने केला त्यानंतर उजव्या मांडीच्या धमनीतून ही प्रक्रिया करण्यात आली स्टेटबसवण्याच्या दरम्यान प्रयत्न दरम्यान रक्तस्त्राव थांबला नाही आणि आईची प्रकृती बिघडून गंभीर झाली व तिचा त्यातच मृत्यू झाला असा दावा तक्रारीत करण्यात आला आहे

आवश्यक तज्ञाची मदत न घेताच उपचार केल्यामुळे आईच्या मूर्ती झाल्याचा आरोप ही डॉक्टर ठेवण्यात आला आहे या घटनेनंतर उपचाराच्या दिवसाचे सीसीटीव्ही फुटेज मागितले असता सुरुवातीला रिकामी सीडी देण्यात आली आणि त्यानंतर संबंधित दिवसाऐवजी दुसऱ्या दिवसाचे फुटेज देण्यात आल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे तसेच या प्रकरणात न्यायालयात पुरवली असल्याचा वैद्यकीय अधिकाऱ्याने चुकीची माहिती देऊन आपली फसवणूक केल्याचा असल्याचे तक्रार म्हटले आहे याप्रकरणी फिर्यादीने न्यायालयात धाव घेतली होती न्यायालयाकडून आदेश मिळाल्यानंतर पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून सदरील प्रकरणात डॉक्टर अशी संपर्क करण्याचा प्रयत्न केला असता त्यांचा संपर्क होऊ शकला नसल्यामुळे नवा मुंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करावा लागला यामध्ये पोलीस सहाय्यक निरीक्षक खंदारे हे अधिक तपास करत आहेत.

कोलकात्यात चेंगराचेंगरी; 19 जणांचा मृत्यू, 25 जखमी

कोलकत्ता : पश्चिम बंगालमधील उत्तर कोलकाता येथील चोरबागान सार्वजनिक दुर्गापूजा मंडपात शनिवारी रात्री चेंगराचेंगरीची घटना घडल्याची माहिती समोर आली आहे. या दुर्घटनेत 19 जणांचा मृत्यू झाला असून 25 जण जखमी झाल्याचे वृत्त आहे. जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शनिवारी रात्री जोरदार पाऊस सुरू असताना दुर्गापूजा मंडपात भाविकांची मोठी गर्दी झाली होती. पावसापासून बचाव करण्यासाठी भाविकांची धावपळ सुरू झाली. त्यातच मंडपात प्रवेश करण्यासाठी गर्दी वाढल्याने परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेली आणि चेंगराचेंगरी झाली, असे सांगितले जात आहे.

या दुर्घटनेतील जखमींना तातडीने कोलकाता मेडिकल कॉलेज आणि रुग्णालयात दाखल करण्यात आले.तेथे काही जणांना मृत घोषित करण्यात आले, तर उपचारादरम्यान काहींचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. जखमींवर उपचार सुरू असून एका व्यक्तीची प्रकृती गंभीर असल्याचे वृत्त आहे.

या घटनेनंतर राज्य सरकारकडून मृतांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत देण्याची घोषणा करण्यात आल्याचे वृत्त आहे. मृतांच्या वारसांना प्रत्येकी 25 लाख रुपये आणि कुटुंबातील एका सदस्याला सरकारी नोकरी देण्याबाबतही घोषणा झाल्याची माहिती समोर आली आहे. जखमींच्या उपचारांचा खर्च सरकारकडून केला जाणार असल्याचे सांगण्यात आले आहे. या चेंगराचेंगरीच्या घटनेची सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात येत आहे. गर्दी नियंत्रणासाठी केलेली व्यवस्था, मंडपातील प्रवेश आणि बाहेर पडण्याचे मार्ग तसेच आपत्कालीन सेवांची उपलब्धता यांची तपासणी होण्याची शक्यता आहे. आयोजक आणि सुरक्षा व्यवस्थेशी संबंधित व्यक्तींची पोलिसांकडून चौकशी सुरू असल्याचे वृत्त आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना डी. लिट. प्रदान

मुंबई : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सावंगी मेघे (वर्धा) येथील अदानी इन्स्टिट्यूट ऑफ हायर एज्युकेशन अँड रिसर्च (एआयएचईआर) या अभिमत विद्यापीठाच्या १७ व्या दीक्षान्त समारंभात मानद डी. लिट. पदवी प्रदान करण्यात आली. या सोहळ्यात राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाचे (एनएमसी) अध्यक्ष डॉ. अभिजात शेठ यांनाही वैद्यकीय शिक्षण, आरोग्य व्यवस्थापन आणि सार्वजनिक आरोग्य क्षेत्रातील योगदानाबद्दल मानद 'डॉक्टर ऑफ सायन्स' (डी.एस्सी.) पदवीने गौरविण्यात आले. विद्यापीठाच्या नावात बदल झाल्यानंतरचा हा पहिलाच दीक्षान्त समारंभ होता.

या समारंभाला मुख्यमंत्री फडणवीस प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. एआयएचईआरच्या कुलपती आणि



अदानी फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. प्रीती अदानी अध्यक्षस्थानी होत्या. राज्यमंत्री डॉ. पंकज राजेश भोयर यांचीही विशेष उपस्थिती होती. यापूर्वी दत्ता मेघे इन्स्टिट्यूट ऑफ हायर एज्युकेशन अँड रिसर्च (डीएमआयएचईआर) या नावाने ओळखल्या जाणाऱ्या संस्थेचे नामकरण एआयएचईआर असे करण्यात आले आहे. दीक्षान्त समारंभात १० विद्याशाखांमधील एकूण २ हजार ३२० विद्यार्थ्यांना पदव्या प्रदान करण्यात आल्या.

अनिल मकरिये यांच्याकडून तुळजाभवानी मातेची आरती

महाराष्ट्र दुष्काळमुक्त होऊन समाधानकारक पाऊस पडण्यासाठी साकडे

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : महाराष्ट्रावरील दुष्काळाचे संकट दूर होऊन राज्यात लवकरात लवकर समाधानकारक पाऊस पडावा, या प्रार्थनेसाठी महानगरपालिकेचे स्थायी समिती सभापती अनिल मकरिये यांनी कुटुंबीयांसह कर्णपुरा येथील श्री तुळजाभवानी मातेची आरती केली. यावेळी त्यांनी देवीचे दर्शन घेऊन राज्यातील शेतकरी आणि सर्वसामान्य



नागरिकांना दिलासा मिळावा, अशी प्रार्थना केली.

पावसाअभावी शेती आणि जनजीवनावर परिणाम होत असताना राज्यात चांगला पाऊस होणे आवश्यक आहे. पावसाने ओढ दिल्याने निर्माण झालेल्या अडचणी दूर व्हाव्यात, शेतकऱ्यांच्या शेतीला नवसंजीवनी मिळावी आणि महाराष्ट्र दुष्काळाच्या संकटातून मुक्त व्हावा, अशी मनोकामना मकरिये यांनी तुळजाभवानी मातेच्या चरणी व्यक्त केली. राज्यात समाधानकारक पाऊस होऊन सर्वत्र सुख-समृद्धी नांदावी, अशी भावनाही त्यांनी यावेळी व्यक्त केली.

कर्णपुरा देवी मंदिरात हजारो महिलांचा दुर्गा सप्तशती पाठ

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : कर्णपुरा देवी मंदिर संस्थान येथे रविवारी (१८ ऑक्टोबर) अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ आध्यात्मिक सेवा केंद्र, श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर प्रणित सामूहिक दुर्गा सप्तशती पाठाचे आयोजन करण्यात आले होते. या धार्मिक कार्यक्रमात हजारो महिला भाविकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

आदिशक्ती माता जगदंबेच्या भक्तिमय वातावरणात महिलांनी श्रद्धापूर्वक दुर्गा सप्तशतीचे सामूहिक पठण केले. मंत्रोच्चार आणि भक्तिभावाने मंदिर परिसर दुमदुमून गेला. या कार्यक्रमातून धार्मिक परंपरा, संस्कार आणि सामूहिक भक्तीचा अनुभव भाविकांना मिळाला.





कर्णपुरा देवी मंदिर संस्थानच्या वतीने आयोजित या कार्यक्रमाला महिला भाविकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. भक्तिमय वातावरणात सामूहिक दुर्गा सप्तशती पाठाची सांगता झाली.

चित्रकूट निवास येथे राज्यमंत्री मेघनाताई बोर्डीकर यांची सदिच्छा भेट

भास्कर आबा दानवे यांच्या निवासस्थानी सत्कार



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

जालना : 'जागर नारीशक्तीचा... होऊया आधार शेतकरी कुटुंबाचा' या नारीशक्ती संवाद उपक्रमानिमित्त महाराष्ट्राच्या राज्यमंत्री मेघनाताई बोर्डीकर यांनी भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांच्या चित्रकूट निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. यावेळी बोर्डीकर यांचा दानवे कुटुंबीयांच्या वतीने कौटुंबिक सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, नगरसेविका सुशीला दानवे, शिवचैतन्य प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रतीक दानवे, डॉ. उत्कर्षा प्रतीक दानवे आदी उपस्थित होते.

प्रसिद्धमोती नमकीनचा परवाना निलंबित; जिंतूरच्या खाद्यतेल प्रतिष्ठान वरही कारवाई

हिंदू प्रकाश वार्ता/ अशोक पवार

परभणी**गेले अनेक दिवसापासून अन्न व औषध प्रशासनाने धाडस सत्र सुरू केले असून त्याचाच एक भाग म्हणून अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी राज्यभरात सुरू केलेले सुरक्षित अन्न व निरोगी महाराष्ट्र या मोहिमे अंतर्गत परभणी जिल्ह्यातील जिंतूर आणि परभणी येथील अन्न आणि औषध प्रशासन विभागाने दिनांक 16 ऑक्टोबर शुक्रवारी रोजी धडक कारवाई करत दोन आस्थापनाचे परवाने निलंबित केले असून या आस्थापनात खाद्यतेल व फरसाण आधीचे नमुने दोषयुक्त आढळले आहेत

जिंतूर येथील तीन ऑइल रि पॅकिंग युनिट मधील तब्बल नऊ क्विंटल 420 किलो अंदाजे 17 लाख 75 हजार किमतीचे खाद्यसाठा जप्त करण्यात आला असून त्यांच्या परवाना निलंबित करण्यात आला आहे तर परभणी येथील प्रसिद्ध मे. मोती नमकीन प्रायव्हेट लिमिटेड या आस्थापनेच्या तपासणीत करून 22 क्विंटल 550 किलो अंदाजे किंमत 63 लाख 14 हजार रुपये मिक्स सेव फरसाणचा साठा जप्त करून परवाना निलंबित करण्यात आला आहे या धडक कारवाईक परभणीत मोठी खळबळ उडाली असून या प्रकरणात परभणीत चर्चेचा विषय रंगला आहे जिंतूर शहरातील तीन वेगवेगळ्या खाद्यतेल पॅकिंग व्यवसायिक प्रतिष्ठान वर अन्न व औषध प्रशासन विभागाने अचानक 16 ऑक्टोबर शुक्रवाररोजी धाड टाकून अन्नसुरक्षा कायदा 2006 च्या तरतुदीचे उल्लंघाने केल्याप्रकरणी जप्तीचे कारवाई केली आहे जिंतूर येथील नवा मुंडा परिसरातील मे मयूर एजन्सी येथून रिफायद सोयाबीन तेल रिफाईड सनफ्लावर तेल आणि रिफाइल पामोलिन तेलाचा तीन क्विंटल किलो 996 किलो यांची अंदाजीत किंमत सहा लाख 26 हजार 920 रुपये आहे यांचा साठा जप्त करण्यात आला.

दुसऱ्या कार्यवाहीत जिंतूर येथील औद्योगिक वसाहित परिस्थितीत मे अथर्व एजन्सी येथून डिफाइन सोयाबीनचा तीन क्विंटल 500 किलो अंदाजे किंमत 670,116 रुपये या मालाचा जप्त केला असून तिसऱ्या कार्यवाहीत जिंतूर येथील येलदरी रस्त्यावरील मे वरद आयुर्वेद इंडस्ट्री येथून रिफाईड सोयाबीन तेलाचा एक क्विंटल 962 किलो अंदाजे किंमत चार लाख 77 हजार 995 रुपये या मालाचा साठा एकूण नऊ क्विंटल 420 किलो अंदाजे किंमत 27 लाख 75 हजार 65 रुपये या मालाचा साठा कमी दर्जाचा असल्याचा संशयावरून जप्त करण्यात आला.

अन्नसुरक्षा मानके परवाना नोंदणी नियमन 2011 मधील परिशिष्ट चारच्या तरतुदी चे उलन केल्या प्रकरणात आढळून आले आहे तर दुसऱ्या एका कारवाईत परभणी येथील एमआयडीसी परिसरातील प्रसिद्ध मी मोती नमकीन प्रायव्हेट लिमिटेड या पिढीची तपासणी करून हळद पावडर मिरची पावडर बेसन करण्याचे तेल राईस पोहा मक्का पोहा अधिक कच्च्या मालाच्या अन्नपदार्थाचे नमुने घेण्यात आले होते तसेच मिक्स सेव फरसाण नमुने घेऊन संबंधित संभावित कमी दर्जाच्या आणि खाद्य तेलाचा पुनर्वापर करून उत्पादित केल्याच्या संशयावरून 22 क्विंटल पाच हजार पाचशे पन्नास किलो अंदाजे किंमत 63 लाख 14 हजार रुपये या मालाचा साठा जप्त करण्यात आला असून तपासणीच्या वेळी अन्नसुरक्षा व मानके परवाना व नोंदणी अधिनियम 2011 चे परिशिष्ट चार मधील तरतुदीचे उल्लंघन झाल्याचे आढळून आले आहे या आस्थापनेत स्वच्छतेचा अभाव उत्पादनात गुणवत्ता नियंत्रणाचा अभाव सुरक्षित अन्नपदार्थ तयार करण्यासाठी अपूर्वी व्यवस्था कामगारांना स्वच्छता आणि प्रशिक्षणाचा अभाव अपुरी प्रकाश व्यवस्था अयोग्य साठवणूक अधिक कारणामुळे पेढीचा परवाना तात्काळ प्रभावाने निलंबित करण्यात आला आहे जप्त करण्यात आलेले सर्व अन्नपदार्थ अधिकृत नमुने घेऊन ते तपासणीसाठी अन्न विश्लेषण प्रयोग शाळेत पाठवण्यात आले असून प्रयोगशाळेचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर प्रचलित कायद्यानुसार दोषी सर्व संबंधितावर उत्पादक आणि विक्रेत्यावर न्यायालयात खटले दाखल करण्यात येणार असून ही कार्यवाही अन्न औषध प्रशासन विभागाचे सह आयुक्त श्रीकांत करवळे यांच्या मार्गदर्शक परभणी येथील अन्नसुरक्षा अधिकारी ठोंबरे मुळे हिंगोली येथील अन्नसुरक्षा अधिकारी भोपे जालना येथील अन्नसुरक्षा अधिकारी असे वार श्रीमती तांबे श्रीमती नगरारे हिंगोली येथील सहाय्यक आयुक्त पवन कुमार खताळ परभणी येथील सहाय्यक आयुक्त अनंत कुमार चौधरी यांच्या विशेष पथकाने केली

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

संपादकीय

सिंहस्थ कुंभमेळा आणि शंखनादाचा जागतिक विश्वविक्रम

आध्यात्मिक ऊर्जा, सांस्कृतिक वारसा आणि लोकसहभागाचा महाकुंभ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या 'सिंहस्थ कुंभमेळ्या'च्या पूर्वतयारीला नाशिकमध्ये आता अभूतपूर्व वेग आला आहे. कुंभमेळ्याच्या आगामी ध्वजारोहण सोहळ्यापूर्वी नाशिकच्या पवित्र गोदातीरावर देवमामलेदार पटांगण परिसरात एकाच वेळी ५०१ जणांच्या शंखनादातून नवा विश्वविक्रम प्रस्थापित करण्याचा अभिनव उपक्रम हाती घेण्यात आला आहे. कोजागिरी पौर्णिमेच्या मुहूर्तावर २५ ऑक्टोबर २०२६ रोजी होणारा हा सामूहिक शंखनाद केवळ एका विक्रमापुरता मर्यादित नसून, तो भारतीय सनातन संस्कृतीच्या प्राचीन परंपरेचा आणि नाशिक-त्र्यंबकेश्वरच्या धार्मिक वैभवाचा संपूर्ण जगाला घडणारा विहंगम परिचय ठरेल. अमेरिकेत ३०३ जणांनी एकत्र येऊन शंखनाद केल्याचा आजवरचा जागतिक विक्रम मोडण्यासाठी ५०१ शंखवादक सज्ज होत आहेत, ही आपल्यासाठी अत्यंत अभिमानास्पद बाब आहे. भारतीय संस्कृतीत कोणत्याही मंगलकार्याचा किंवा पर्वाचा शुभारंभ शंखनादाने करण्याचे पवित्र विधान आहे. शंखाचा नाद हा केवळ पावित्र्य आणि सकारात्मक ऊर्जेचे प्रतीक नाही, तर त्याचे शरीरावरील आणि श्वसनक्रियेवरील वैज्ञानिक व आरोग्यविषयक फायदेही महत्त्वपूर्ण आहेत. चेन्नई येथून अस्सल शंख मागवून या कार्यक्रमाची तयारी केली जात असून, यात स्थानिक संस्था, स्वयंसेवी संघटना आणि नागरिक मोठ्या प्रमाणावर सहभागी होणार आहेत. सिंहस्थाच्या आगमनाची ही मंगलदुंदुभी संपूर्ण गोदातीरावरून सातासमुद्रापार भारतीय संस्कृतीचा गजर घडवणारी ठरेल. सिंहस्थ कुंभमेळा यशस्वी करण्यासाठी प्रशासकीय तयारीसोबतच अशा सांस्कृतिक व धार्मिक उपक्रमांची जोड असणे अत्यंत आवश्यक असते. या निमित्ताने नाशिकच्या धार्मिक पर्यटनाला आणि सांस्कृतिक वारशाला जागतिक स्तरावर एक नवी ओळख मिळेल. एकीकडे भव्यदिव्य व्यवस्था आणि दुसरीकडे अध्यात्माचा मूळ प्रवाह टिकवून ठेवणारे हे आयोजन नाशिकच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवणारे आहे. आगामी सिंहस्थ कुंभमेळा हा शिस्तबद्ध, पर्यावरणपूरक आणि संस्कृतीचे जतन करणारा ठरेल, असा विश्वास या शंखनादाच्या मंगलध्वनीतून निर्माण होत आहे.

व्हिबी-जी राम जी अंतर्गत दुष्काळात हाताला काम; एका फोनवर नोंदवा रोजगाराची मागणी

जालना जिल्हा प्रशासनाची हेल्पलाइन सुरू; 15 दिवसांत काम देणे बंधनकारक

हिंदू प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

परभणी: जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीत ग्रामीण भागातील मजुरांना गावातच रोजगार उपलब्ध व्हावा, यासाठी जिल्हा प्रशासनाने रोजगार मागणी हेल्पलाइन सुरू केली आहे. विकसित भारत - रोजगार आणि आजीविका हमी अभियान (ग्रामीण) अर्थात (VB-G RAM G) अंतर्गत ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे मजुरांना आता रोजगाराची मागणी नोंदवण्यासाठी ग्रामपंचायत किंवा तालुका कार्यालयात जाण्याची गरज नाही. याकरीता ८२७५५ २०२४१ या हेल्पलाइन क्रमांकावर फोन करून घरबसल्या कामाची मागणी नोंदवता येणार आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयातील VB-G RAM G शाखेमार्फत ही हेल्पलाइन चालविण्यात येत आहे. सकाळी 8 ते रात्री 8 या वेळेत, सार्वजनिक सुट्ट्यांसह आठवड्यातील सर्व दिवस ही सेवा सुरू राहणार आहे. मजुरांनी या क्रमांकावर मिस्ड कॉल दिल्यास हेल्पलाइनकडून त्यांना परत फोन केला जाईल आणि रोजगाराच्या मागणीची नोंद घेतली जाईल. त्यामुळे ग्रामीण भागातील मजुरांना रोजगार मिळवण्यासाठी सोपी आणि सुलभ सुविधा उपलब्ध झाली आहे.

कामाची मागणी, नोंदणी आणि तक्रारीही करता येणार

या हेल्पलाइनवर केवळ रोजगाराची मागणीच नव्हे, तर जॉब कार्ड नसलेल्या कुटुंबांना नोंदणीची मागणीही करता येणार आहे. याशिवाय मागणी करूनही काम न मिळणे, मजुरी मिळण्यास विलंब होणे किंवा कामाच्या ठिकाणी आवश्यक सुविधा उपलब्ध नसणे, अशा तक्रारीही नोंदवता येणार आहे.

फोन करतांना मजुरांनी स्वतःचे नाव, भ्रमणध्वनी क्रमांक, तालुका, ग्रामपंचायत आणि गावाचे नाव सांगणे आवश्यक आहे. जॉब कार्ड असल्यास त्याचा क्रमांकही द्यावा. कुटुंबातील किती व्यक्तींना रोजगार हवा आहे, किती दिवस कामाची आवश्यकता आहे आणि कोणत्या दिनांकापासून काम सुरू करायचे आहे, याची माहितीही द्यावी लागेल. हेल्पलाइनवर मागणीची नोंद झाल्यानंतर प्रत्येक प्रकरणाला स्वतंत्र संदर्भ क्रमांक दिला जाईल. हा क्रमांक मजुरांनी जपून ठेवावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. पुढील पाठपुरावा करताना या संदर्भ क्रमांकाचा उपयोग होणार आहे.

मागणी केल्यानंतर 15 दिवसांत काम देणे आवश्यक आहे.

हेल्पलाइनवर नोंदविलेली रोजगाराची मागणी त्याच दिवशी संबंधित ग्राम रोजगार सेवक आणि कार्यक्रम अधिकाऱ्यांकडे पाठवली जाणार आहे. त्यानंतर संबंधित ग्रामपंचायतीकडून मजुराला मागणीची दिनांकित पावती दिली जाईल. त्यामुळे रोजगाराची मागणी केव्हा करण्यात आली, याची अधिकृत नोंद मजुराकडे राहणार आहे.

योजनेच्या नियमानुसार, रोजगाराची मागणी केल्यानंतर 15 दिवसांच्या आत काम उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे. या मुदतीत काम न मिळाल्यास संबंधित मजूर नियमानुसार बेरोजगारी भत्त्यास पात्र ठरू शकतो. प्रत्येक प्रकरणात मजुरांना वेळेत काम मिळत आहे की नाही, याचा जिल्हा स्तरावरून पाठपुरावा करण्यात येणार आहे.

वर्षाला 125 दिवस रोजगाराची हमी

या योजनेअंतर्गत प्रत्येक ग्रामीण कुटुंबाला वर्षाला 125 दिवसांच्या रोजगाराची हमी आहे. काम शक्यतो मजुरांच्या गावापासून पाच किलोमीटरच्या आत उपलब्ध करून दिले जाते. कामाची मजुरी थेट मजुरांच्या बँक खात्यात जमा केली जाते. तसेच राज्याच्या रोजगार हमी योजनेनुसार पावसाळ्यातही मागणी केल्यास काम उपलब्ध करून दिले जाते.

जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता, रोजगारासोबतच जलसंधारणाच्या कामांनाही प्राधान्य दिले जाणार आहे. तलावांतील गाळ काढणे, नाल्यांचे पुनरुज्जीवन, विहिरी आणि बोअरवेलचे पुनर्भरण यांसारखी कामे हाती घेण्यात येणार आहेत. या कामांमुळे ग्रामीण मजुरांना रोजगार मिळण्यास मदत होणार आहे. तसेच पावसाचे पाणी साठवणे आणि भूजलपातळी वाढविण्यासाठीही या कामांचा उपयोग होणार आहे.

आधार, बँक खाते आणि ओटीपीची माहिती देऊ नका

हेल्पलाइनच्या माध्यमातून रोजगाराची मागणी नोंदवताना नागरिकांनी सावधगिरी बाळगावी, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. हेल्पलाइनवरून कोणत्याही मजुराला आधार क्रमांक, बँक खाते क्रमांक किंवा ओटीपी विचारला जात नाही. अशा प्रकारची माहिती कोणी मागितल्यास ती देऊ नये.

जिल्ह्यातील सर्व ग्रामीण मजुरांनी या सुविधेचा लाभ घेऊन रोजगाराची मागणी नोंदवावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. तसेच सरपंच, ग्रामसेवक, ग्राम रोजगार सेवक आणि लोकप्रतिनिधींनी हेल्पलाइन क्रमांक गावागावांत पोहोचवून जास्तीत जास्त मजुरांपर्यंत ही माहिती पोहोचवावी, असे विकसित भारत - रोजगार आणि आजीविका हमी अभियान (ग्रामीण) विभाग अर्थात (VB-G RAM G), जिल्हाधिकारी कार्यालय यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे.

रोजगार मागणी हेल्पलाइन

हेल्पलाइन क्रमांक : ८२७५५ २०२४१

सेवेची वेळ : सकाळी ८ ते रात्री ८

सेवा : सार्वजनिक सुट्ट्यांसह सर्व दिवस

रोजगाराची हमी : मागणीपासून १५ दिवसांत काम

वार्षिक रोजगार : प्रत्येक ग्रामीण कुटुंबाला १२५ दिवस

मजुरी : थेट बँक खात्यात जमा

महत्त्वाचे : मिस्ड कॉल दिल्यानंतर परत फोन करून मागणी नोंदवली जाईल. नोंदणीवेळी मिळालेला संदर्भ क्रमांक जपून ठेवा. आधार क्रमांक, बँक खाते क्रमांक किंवा ओटीपी कोणालाही सांगू नका.

डॉ. प्रियंका जाधव यांचे एमडीएस परीक्षेत उज्ज्वल यश

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



छत्रपती संभाजीनगर : डॉ. प्रियंका साईनाथ पाटील जाधव यांनी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्या हिवाळी २०२६ परीक्षेत एमडीएस भाग-२ मध्ये यश संपादन केले. त्यांनी अहिल्यानगर येथील यशवंतराव चव्हाण डेंटल कॉलेज अँड हॉस्पिटलमधून ऑर्थोडॉन्टिक्स अँड डेंटोफेशियल ऑर्थोपेडिक्स या विषयातील पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले. परीक्षेत त्यांनी ६०० पैकी ३८२ गुण मिळविले.

डॉ. प्रियंका या साईसेवा बहुउद्देशीय प्रतिष्ठानचे अध्यक्ष तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस साईनाथ पाटील जाधव यांच्या कन्या आहेत. त्यांच्या यशाबद्दल कुटुंबीय, नातेवाईक, मित्रपरिवार आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांकडून अभिनंदन केले जात आहे.

गोदा पात्रातील अवैध वाळू उपशावर महसूल पथकांचा छापा; दहा ब्रास वाळू जप्त

हिंदू प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी

परभणी**परभणी जिल्ह्यातील पूर्णा तालुक्यातील सातेफळ येथील गोदा गोदा नदीपात्रात सुरू असलेल्या अवैध वाळू उपसा विरोधात महसूल विभागाच्या विशेष पत्काने नायब तहसीलदार प्रशांत हारकर यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथकाने नदीपात्रात छापा टाकून वाळू उपसा साठी वापरण्यात येणारे चार तराफे जाळून नष्ट केले व यावेळी त्या ठिकाणी चे दहा ब्रास वाळूही जप्त करण्यात आली सातेफळ येथील गोदावरी नदीच्या पात्रात अवैधरित्या वाळू उपसा होत असल्याची माहिती महसूल विभागाला मिळाली होती या माहितीच्या आधारे महसूल विभागाच्या विशेष पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेत सदरील कार्यवाही केली या मोहिमेत अवैध वाळू उपसा साठी वापरण्यात येणारे चार तराफे नष्ट करण्यात आले असून त्या ठिकाणची दहाप्रास वाळू जप्त करण्यात आली आहे या कार्यवाहीत मंडळ अधिकारी टेकाळे तलाठी कवडे तोडे चांदवडे देवडे गडगिळे रणमाळ मोरे कोमटवार शेलाटे आधी महसूल कर्मचाऱ्यांच्या सहभाग होता कार्यवाहीदरम्यान कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी पोलिसांनी मदत घेण्यात आली पोलीस पाटील गुरवंत बीट जमादार कच्छवे आणि पोलीस कर्मचारी जाधव यांनी सहकार्य केले यादरम्यान जप्त केलेल्या वाळूचाबाळूचा साठा तहसीलदाराच्या निर्देशा नुसार घरकुल धारकांना वाटप करण्यात येणार असल्याचे नायब तहसीलदार प्रशांत खारकर यांनी माहिती दिली.

श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्थेतर्फे नवरात्रौत्सवानिमित्त कर्तृत्ववान महिलांचा सन्मान

विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या नऊ महिलांचा गौरव



उरण दि. १८ (विठ्ठल ममताबादे) नवरात्रौत्सवाचे औचित्य साधून श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्थेतर्फे दरवर्षीप्रमाणे यंदाही विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कर्तृत्ववान महिलांचा सन्मान सोहळा रविवार, दि. १८ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आला होता. उरण मधील कोप्रोली चौक येथे शिक्षक प्रतिक मुंबईकर यांच्या रँकऑन अकॅडेमी क्लासेसच्या ठिकाणी हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या सोहळ्याला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

समाजाच्या जडणघडणीत महिलांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. सामाजिक, वैद्यकीय, पत्रकारिता, कृषी, प्रशासकीय, शैक्षणिक तसेच इतर विविध क्षेत्रांत महिला आपल्या कार्यकर्तृत्वाच्या जोरावर समाजात महत्त्वपूर्ण योगदान देत आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने या सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाच्या व्यासपीठावर आदर्श शिक्षक सुधीर मुंबईकर, आदर्श शिक्षिका साधना मुंबईकर, पंचायत समिती सदस्य कविता पाटील आणि सामाजिक कार्यकर्ते महेश पाटील उपस्थित होते. मान्यवरांच्या उपस्थितीत विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या नऊ महिलांचा सन्मान व सत्कार करण्यात आला.

या सर्व महिलांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करून त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला.नवरात्रौत्सवाच्या निमित्ताने महिलांच्या कर्तृत्वाचा सन्मान करणारा हा उपक्रम उपस्थितांसाठी प्रेरणादायी ठरला.कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्थेच्या सर्व पदाधिकारी व सदस्यांनी विशेष मेहनत घेतली. महिलांच्या कार्याचा गौरव करून त्यांना प्रोत्साहन देणाऱ्या या उपक्रमाचे उपस्थितांकडून कौतुक करण्यात आले. सदर कार्यक्रमाचे उत्तम असे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन सुनील वर्तक व चेतन पाटील यांनी केले. उपस्थित मान्यवरांनी सदर उपक्रमाचे विशेष कौतुक केले.या कार्यक्रमाला आदर्श शिक्षक सुधीर मुंबईकर,आदर्श शिक्षिका साधना मुंबईकर, शिक्षक प्रतिक मुंबईकर यांचे विशेष सहकार्य लाभले.

विविध क्षेत्रांतील नऊ कर्तृत्ववान महिलांचा गौरव करून या सन्मान सोहळ्यात महिलांचा त्यांच्या कार्यक्षेत्रातील योगदानाबद्दल गौरव करण्यात आला.

१. सौ. कविता रुपेश पाटील — सामाजिक क्षेत्र २. श्रीमती चैताली केसरीनाथ घरत — वैद्यकीय क्षेत्र ३. श्रीमती सायली साळुंके — पत्रकारिता क्षेत्र ४. सौ. कुसुम भानुदास पाटील — शेतकरी क्षेत्र ५. सौ. जयश्री पवन म्हात्रे — प्रशासकीय क्षेत्र ६. सौ. संध्या पांडुरंग ठाकूर — अंगणवाडी सेविका ७. सौ. माधुरी शेलार — न्यायदान क्षेत्र (वकिली व्यवसाय) ८. सौ. ज्योती गणेश पाटील — शिक्षण क्षेत्र ९. सौ. रोहिणी प्रकाश जाधव — पोलीस प्रशासन.

मराठवाडा पदवीधर संघटनेचे डॉ. रोहित बोरकर यांचा आज हिंगोली दौरा!

रोजगार आणि विविध प्रश्नांवर साधणार संवाद



हिंगोली : मराठवाडा पदवीधर संघटनेचे उमेदवार डॉ. रोहित बोरकर हे आज हिंगोली जिल्ह्याच्या दौऱ्यावर येणार असून, या दौऱ्यादरम्यान ते जिल्ह्यातील पदवीधरांशी संवाद साधणार आहेत. पदवीधर संघाची निवडणुक अंतिम टप्प्यात आली आहे. सर्व उमेदवार ताकतीने प्रचार करत आहेत. ह्यातच एक नाव सर्वाधिक चर्चेत येत आहे ते म्हणजे एक रुपयात दवाखाना सेवा डॉ. रोहित बोरकर.शिक्षक, कृषी, स्पर्धा परीक्षा, आरोग्य सेवा ई भरती वर आंदोलने आणि मोर्चा डॉ बोरकर सतत अग्रेसर दिसतात.संपूर्ण मराठवाडा डॉ बोरकर पिंजून काढात आज हिंगोली दौरावर आहेत. पदवीधर संवाद दौऱ्याच्या माध्यमातून पदवीधरांच्या विविध समस्या, रोजगाराच्या संधी, बेरोजगारी, शैक्षणिक प्रश्न आरोग्य भरती तसेच पदवीधरांच्या हक्कांशी संबंधित विषयांवर चर्चा केली जाणार आहे. आजच्या स्पर्धात्मक युगात उच्चशिक्षित तरुणांसमोर रोजगार, करिअर आणि शासकीय योजनांचा लाभ मिळविण्यासह अनेक आव्हाने उभी आहेत. या पार्श्वभूमीवर पदवीधरांचे प्रश्न जाणून घेणे, त्यांच्या अडचणी समजून घेणे आणि त्यांच्या मागण्यांना योग्य व्यासपीठ मिळवून देणे, हा या संवाद दौऱ्यामागील मुख्य उद्देश आहे.

या दौऱ्यात डॉ. रोहित बोरकर हे पदवीधर युवक-युवतींशी थेट संवाद साधून त्यांच्या समस्या व सूचना जाणून घेणार आहेत. तसेच पदवीधरांच्या प्रश्नांवर संघटनेच्या माध्यमातून पुढील दिशा ठरविण्याबाबतही चर्चा होण्याची शक्यता आहे.

हिंगोली जिल्ह्यातील जास्तीत जास्त पदवीधरांनी या संवाद दौऱ्यात सहभागी होऊन आपल्या समस्या, सूचना आणि अपेक्षा मांडाव्यात, असे आवाहन करण्यात येत आहे.

'सोने पे डबल सुहागा' ऑफर,

मुंबई : गेल्या सणासुदीच्या हंगामातील आपल्या 'सोने पे सुहागा' मोहिमेला मिळालेल्या भरघोस यशानंतर फिलिप्स होम अप्लायन्सेस आता अधिक भव्य 'सोने पे डबल सुहागा' या सणासुदीच्या संकल्पनेसह पुन्हा सज्ज झाली आहे. सणासुदीच्या काळात दिलेले आश्वासन आणखी एक पाऊल पुढे नेत ही मोहीम ग्राहकांना पात्र फिलिप्स होम अप्लायन्सेसच्या खरेदीवर खात्रीशीर भेटवस्तू देण्यासोबत दर तासाला ९,९९९ रुपये किमतीचे सोने आणि दररोज ५०,००० रुपये किमतीचा हिरा जिंकण्याची उत्साहवर्धक संधी देऊन सणासुदीच्या खरेदीचा आनंद अधिक उत्साहित करते.

महाडमध्ये चवदार तळे सत्याग्रह शतकपूर्ती सोहळा उत्साहात संपन्न

मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. डॉ. रवींद्र कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती; पुस्तक प्रकाशनातून ऐतिहासिक विचारांना उजाळा





बोरघर / माणगांव : सामाजिक समता, मानवी प्रतिष्ठा आणि सामाजिक न्यायाचा संदेश देणाऱ्या ऐतिहासिक चवदार तळे सत्याग्रहाच्या शतकपूर्तीनिमित्त महाड येथे आयोजित शतकपूर्ती सोहळा उत्साहात संपन्न झाला. मुंबई विद्यापीठाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय संशोधन केंद्र, मुंबई, हिरवळ एज्युकेशन ट्रस्टचे कॉलेज ऑफ सायन्स (कॉम्प्युटर सायन्स अँड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी), महाड, डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज, महाड आणि लोकविकास सामाजिक संस्था संचलित एम. एम. जगताप कॉलेज, महाड यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या सोहळ्याला मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. रवींद्र डी. कुलकर्णी, प्रमुख पाहुणे ॲड. क्षितिज गायकवाड, हिरवळ एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष श्री. किशोर धारिया आणि मुंबई विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय संशोधन केंद्राचे संचालक प्रा. डॉ. वाल्मिक सरवदे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

तिन्ही आयोजक महाविद्यालयांचे प्रतिनिधित्व करत डॉ. योगेश प्रमिला प्रभाकर बोराळे, प्रभारी प्राचार्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, महाड; श्री. सुदेश कदम, प्रभारी प्राचार्य, हिरवळ एज्युकेशन ट्रस्टचे कॉलेज ऑफ सायन्स (कॉम्प्युटर सायन्स अँड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी), महाड; आणि डॉ. अंजय धनावडे, प्रभारी प्राचार्य, एम. एम. जगताप कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, महाड हे उपस्थित होते.

यावेळी वरील तीनही महाविद्यालयाचे प्राध्यापकवृंद,व्यवस्थापकीय कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज आणि भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलनाने झाली. या मंगलप्रसंगी स्वराज्य, समता, स्वाभिमान आणि सामाजिक न्यायाच्या मूल्यांना अभिवादन करण्यात आले. त्यानंतर राष्ट्रगीत, महाराष्ट्र गीत आणि मुंबई विद्यापीठ गीत सादर करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुंबई विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय संशोधन केंद्राचे संचालक प्रा. डॉ. वाल्मिक सरवदे यांनी केले. यावेळी त्यांनी चवदार तळे सत्याग्रहाच्या ऐतिहासिक महत्त्वावर प्रकाश टाकला. २० मार्च १९२७ रोजी महाडच्या भूमीत घडलेला हा सत्याग्रह सामाजिक विषमता आणि अस्पृश्यतेविरुद्धच्या संघर्षातील महत्त्वपूर्ण टप्पा ठरला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या आंदोलनाच्या माध्यमातून प्रत्येक व्यक्तीला समान प्रतिष्ठा आणि हक्क मिळण्याचा विचार समाजासमोर मांडला. या ऐतिहासिक वारशाचे स्मरण करणे, त्यामागील सामाजिक विचार समजून घेणे आणि नव्या पिढीपर्यंत समता व सामाजिक न्यायाचा संदेश पोहोचविणे आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

कार्यक्रमाचे स्वागतपर भाषण हिरवळ एज्युकेशन ट्रस्टचे कॉलेज ऑफ सायन्स (कॉम्प्युटर सायन्स अँड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी), महाडचे प्रभारी प्राचार्य श्री. सुदेश कदम यांनी केले. त्यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत करून या ऐतिहासिक सोहळ्याचे महत्त्व विशद केले. शिक्षणसंस्थांनी शैक्षणिक प्रगतीसोबतच सामाजिक समता, बंधुता, स्वाभिमान आणि संविधानिक मूल्यांच्या संवर्धनासाठी योगदान देणे आवश्यक असल्याचा संदेश या कार्यक्रमाच्या संदर्भातून अधोरेखित झाला. मुंबई विद्यापीठ आणि सहभागी संस्थांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या सोहळ्यामुळे चवदार तळे सत्याग्रहाचा विचार नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्यास मदत होणार आहे.

हिरवळ एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष श्री. किशोर धारिया यांनी आपल्या मनोगतातून सामाजिक कार्य, शिक्षण, पर्यावरण संवर्धन आणि समाजाच्या सर्वांगीण विकासाचे महत्त्व विशद केले. पद्मविभूषण डॉ. मोहन धारिया यांच्या विचारांनी प्रेरित हिरवळ समूहाच्या विविध सामाजिक आणि शैक्षणिक उपक्रमांचाही या संदर्भात उल्लेख करण्यात आला.

प्रमुख पाहुणे ॲड. क्षितिज गायकवाड,सदस्य,डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती, यांनी आपल्या मार्गदर्शनपर मनोगतातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार, संविधानिक मूल्ये आणि सामाजिक समतेची आवश्यकता यांवर प्रकाश टाकला. सामाजिक न्यायाची मूल्ये समाजाच्या सर्व स्तरांपर्यंत पोहोचविण्यासाठी शिक्षण आणि वैचारिक प्रबोधन महत्त्वाचे असल्याचा संदेश या कार्यक्रमातून अधोरेखित झाला.

या सोहळ्याचे विशेष आकर्षण म्हणजे 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर ॲंग्रीकल्चर थॉट्स अँड पॉलिसीज' या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ. मुंबई विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय संशोधन केंद्राचे संचालक प्रा. डॉ. वाल्मिक सरवदे यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या उपक्रमातून संशोधन, ज्ञाननिर्मिती आणि विचारांचे दस्तऐवजीकरण यांना प्रोत्साहन मिळाले. पुस्तकांच्या माध्यमातून महत्त्वपूर्ण विचार आणि संशोधन पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टीने या प्रकाशनाला विशेष महत्त्व प्राप्त झाले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. रवींद्र कुलकर्णी यांनी शिक्षण, संशोधन आणि सामाजिक जाणीव यांच्या महत्त्वावर विचार मांडले. विद्यापीठे ही केवळ उच्च शिक्षण देणारी केंद्रे नसून सामाजिक जाणीव, चिकित्सक विचार आणि लोकशाही मूल्यांचे संवर्धन करणारी महत्त्वाची व्यासपीठे आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा जपत शिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तन घडवून आणण्याचे महत्त्व या सोहळ्याच्या निमित्ताने अधोरेखित झाले.

या शतकपूर्ती सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी तिन्ही महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी महत्त्वपूर्ण पुढाकार घेतला. डॉ. योगेश प्रमिला प्रभाकर बोराळे, प्रभारी प्राचार्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, महाड; श्री. सुदेश कदम, प्रभारी प्राचार्य, हिरवळ एज्युकेशन ट्रस्टचे कॉलेज ऑफ सायन्स (कॉम्प्युटर सायन्स अँड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी), महाड; आणि डॉ. अंजय धनावडे, प्रभारी प्राचार्य, एम. एम. जगताप कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, महाड यांच्या समन्वयातून व नियोजनातून या ऐतिहासिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी डॉ. योगेश प्रमिला प्रभाकर बोराळे यांनी आभार प्रदर्शन केले. उपस्थित मान्यवर, सहभागी संस्था, प्राध्यापक, विद्यार्थी आणि आयोजनासाठी सहकार्य करणाऱ्या सर्वांचे त्यांनी आभार मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

चवदार तळे सत्याग्रहाच्या शतकपूर्तीच्या निमित्ताने आयोजित या सोहळ्यातून समता, स्वाभिमान, शिक्षण आणि सामाजिक न्यायाचा विचार पुन्हा एकदा अधोरेखित झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या परिवर्तनवादी विचारांचे स्मरण करून ते प्रत्यक्ष जीवनात आचरणात आणण्याचा प्रेरणादायी संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

संमिश्र वार्ता

मिशन मौसमअंतर्गत वनामकृवित उभारणार अत्याधुनिक एकात्मिक हवामान निरीक्षण प्रणाली

वनामकृवि - भारत मौसम विज्ञान विभाग (IMD) यांच्यात सामंजस्य करार; मराठवाड्यातील हवामान अंदाज व कृषि हवामान सल्ला सेवांना मिळणार बळ

हिंदु प्रकाश वार्ता/प्रतिनिधी

परभणी**मराठवाड्यातील हवामान निरीक्षण, अचूक हवामान अंदाज आणि शेतकऱ्यांसाठी कृषि हवामान सल्ला सेवा अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. भारत मौसम विज्ञान विभाग (IMD), मुंबई आणि वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांच्यात केंद्र शासनाच्या 'मिशन मौसम' उपक्रमांतर्गत एकात्मिक हवामान निरीक्षण प्रणाली (Integrated Meteorological Observation System–IMOS) उभारण्यासाठी दि. १६ ऑक्टोबर रोजी सामंजस्य करार करण्यात आला.

ही अत्याधुनिक प्रणाली विद्यापीठातील अखिल भारतीय समन्वित कृषि हवामानशास्त्र संशोधन प्रकल्प (AICRP on Agrometeorology) येथे उभारण्यात येणार आहे. या प्रणालीअंतर्गत सी-बँड पोलॅरिमेट्रिक डॉप्लर हवामान रडार (C-Band Polarimetric Doppler Weather Radar), मानक हवामान उपकरणांनी सुसज्ज पृष्ठभागीय हवामान वेधशाळा (Surface Meteorological Observatory) आणि रेडिओसॉन्ड वेधशाळा (Radiosonde Observatory) या तीन महत्त्वपूर्ण सुविधा विकसित करण्यात येणार आहेत. रेडिओसॉन्ड प्रणालीद्वारे हवामान फुग्याच्या साहाय्याने वातावरणाच्या उच्च स्तरांवरील तापमान, आर्द्रता, वाऱ्याचा वेग व दिशा यांसारख्या हवामानविषयक घटकांची निरीक्षणे घेता येतील.

या सामंजस्य करारप्रसंगी विद्यापीठाचे माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि आणि प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबईचे प्रमुख तथा वैज्ञानिक श्री. बिक्रम सिंह उपस्थित होते. विद्यापीठाच्या वतीने विभाग प्रमुख डॉ. हरिहर कौसडीकर व हवामान शास्त्रज्ञ डॉ. कैलास डाखोरे, तर भारत मौसम विज्ञान विभागाच्या वतीने श्री. शंभू रवींद्रन, श्री. महेश बुरटे, श्री. पठाण यांच्यासह अन्य अधिकारी उपस्थित होते.

हवामान आधारित शेतीला मिळणार नवी दिशा

माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांनी मराठवाड्यात अत्याधुनिक हवामान निरीक्षण सुविधांची उभारणी होत असल्याबद्दल समाधान व्यक्त केले. या प्रणालीमुळे हवामानविषयक निरीक्षणांची वैज्ञानिक क्षमता वाढेल. तसेच हवामानातील बदलांचे अधिक प्रभावी विश्लेषण करून शेतीसह विविध क्षेत्रांसाठी उपयुक्त हवामान आधारित सेवा विकसित करण्यास मदत होईल, असे त्यांनी नमूद केले.

बिक्रम सिंह यांनी वनामकृवि येथे उभारण्यात येणारी एकात्मिक हवामान निरीक्षण प्रणाली ही वैशिष्ट्यपूर्ण सुविधा ठरेल, असे सांगितले. या केंद्रामार्फत हवामान निरीक्षण, माहिती संकलन व विश्लेषण आणि हवामान अंदाज निर्मिती यांना चालना मिळण्यासोबतच भविष्यात देशातील अशा प्रकारच्या उपक्रमांसाठी हे केंद्र संदर्भ व मार्गदर्शन केंद्र म्हणून विकसित होण्याची क्षमता असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

हवामान माहिती संकलनापासून अंदाज निर्मितीपर्यंत मार्गदर्शन

सामंजस्य कराराच्या निमित्ताने वनामकृविचे प्राध्यापक व कर्मचारी आणि भारत मौसम विज्ञान विभागाच्या अधिकाऱ्यांमध्ये संवादात्मक सत्र आयोजित करण्यात आले. यामध्ये हवामान निरीक्षण, हवामानविषयक माहितीचे संकलन, तिचे विश्लेषण, हवामान अंदाज तयार करण्याची प्रक्रिया आणि विविध हवामानविषयक उत्पादनांची निर्मिती याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.

IMD च्या निथा, सुष्मा अय्यर आणि जिस्मी यांनी हवामान निरीक्षणापासून माहिती प्रक्रिया व विश्लेषणापर्यंतच्या विविध टप्प्यांची माहिती दिली. तसेच विभागाकडून उपलब्ध होणाऱ्या हवामान अंदाजांचा शेतस्तरावरील कृषि नियोजनासाठी प्रभावी वापर कसा करता येईल, याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले.

हवामानातील अनिश्चितता, पावसाचे बदलते स्वरूप आणि अवकाळी पाऊस यांसारख्या आव्हानांच्या पार्श्वभूमीवर ही प्रणाली मराठवाड्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

भोगाव देवी मंदिरात महिलेच्या गळ्यातील 18 ग्रॅम सोन्याचे गंठण चोरीला

बोरी, दि. १७ (प्रतिनिधी) : जिंतूर तालुक्यातील भोगाव येथील देवीच्या मंदिरात दर्शनासाठी गेलेल्या महिलेच्या गळ्यातील १८ ग्रॅम वजनाचे सोन्याचे गंठण अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी बोरी येथील रहिवासी नितीन मच्छिंद्रराव काठोळे वय 35 यांनी जिंतूर पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दाखल केली असून, चोरट्याचा शोध घेऊन कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

तक्रारीनुसार, नितीन काठोळे हे दि. १६ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी अंदाजे १२ वाजून ४४ मिनिटांनी पत्नी दीपाली काठोळे हिच्यासोबत भोगाव येथील देवीच्या मंदिरात दर्शनासाठी गेले होते. दर्शन घेऊन मंदिरातून बाहेर आल्यानंतर त्यांच्या पत्नीच्या गळ्यातील सोन्याचे गंठण दिसून आले नाही.

त्यानंतर पती-पत्नीने मंदिर परिसरात तसेच आजूबाजूच्या भागात गंठणाचा शोध घेतला. मात्र, गंठण मिळून आले नाही. त्यामुळे गर्दीचा फायदा घेऊन अज्ञात चोरट्याने पत्नीच्या गळ्यातील १८ ग्रॅम वजनाचे सोन्याचे गंठण चोरून नेल्याचा संशय तक्रारीत व्यक्त करण्यात आला आहे. या घटनेची सखोल चौकशी करून चोरीस गेलेले सोन्याचे गंठण शोधून काढावे आणि संबंधित अज्ञात चोरट्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी नितीन काठोळे यांनी जिंतूर पोलीस ठाण्यात दिलेल्या अर्जाद्वारे केली आहे.

अमर म्हात्रे विचारमंच व जीवदानी महिला उत्कर्ष मंडळाच्या नवरात्रोत्सवाला विविध मान्यवरांची भेट.



उरण दि १८(विठ्ठल ममताबादे)अमर म्हात्रे विचारमंच व जीवदानी महिला उत्कर्ष मंडळ यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या नवरात्रोत्सवाला विविध मान्यवरांनी भेट देऊन देवीचे दर्शन घेतले. यावेळी महाराष्ट्र विधान परिषदेचे उपसभापती सचिन भाऊ अहिर, जिल्हाप्रमुख विनोदजी साबळे आणि आशिष शेलार यांनी नवरात्रोत्सव मंडळाला भेट दिली. तसेच महाराष्ट्र ट्रिपल केसरी व भारत सरकार पदक विजेते पैलवान एसीपी विजय चौधरी यांनीही अमर म्हात्रे विचारमंच व जीवदानी महिला उत्कर्ष मंडळाच्या वतीने आयोजित नवरात्रोत्सवात उपस्थित राहून देवीचे दर्शन घेतले.मान्यवरांच्या भेटीमुळे मंडळाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने धार्मिक भक्तिभावासह सामाजिक एकोपा आणि सांस्कृतिक परंपरेचे दर्शन घडले.

कोमनादेवी ऑक्सिजन पार्कमधील झाडांच्या बाजूच्या गवताची सफाई

उरण दि १८(विठ्ठल ममताबादे) सारडे गावातील प्रसिद्ध कोमनादेवी ऑक्सिजन पार्क परिसरात लागवड केलेल्या असंख्य झाडांच्या बाजूला वाढलेल्या गवताची सफाई आज निसर्गप्रेमींच्या मदतीने करण्यात आली.

डोंगराला दिवाळीपूर्वीच वणवा लागण्याची शक्यता लक्षात घेता, गवत सुकल्यानंतर लागणाऱ्या किंवा लावल्या जाणाऱ्या वणव्यापासून झाडांचे संरक्षण व्हावे, या उद्देशाने गेली अनेक वर्षे सारडे विकास मंच, उरण रायगड यांच्या माध्यमातून दिवाळीपूर्वी गवताची सफाई केली जाते.निसर्ग संवर्धनाची ही जबाबदारी केवळ बोलण्यापुरती न ठेवता प्रत्यक्ष कृतीतून जपण्याचा प्रयत्न दरवर्षी केला जातो. याच उपक्रमांतर्गत यावर्षी हॉटेल एमडीएस चे मालक नितीन म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली आज गवताची सफाई करण्यात आली. या कार्यासाठी अनेक निसर्गप्रेमींचे हात पुढे आले. यामध्ये जीवनगौरव पुरस्कार विजेते हरिश्चंद्र म्हात्रे (पाले), प्रा. अनिल नायडू, प्रशांत म्हात्रे, श्री गणेश फर्निचरचे मालक विनोद पाटील, गणेश जी पाटील, ग्रासकटर ऑपरेटर निशिकांत दादा गावंड, तसेच इतर निसर्गप्रेमींचा सहभाग होता.

काही भागातील गवताची सफाई महिला मजुरांच्या माध्यमातून, तर काही भागाची सफाई ग्रासकटरच्या साहाय्याने करण्यात आली.

महिला मजुरांची मजुरी हॉटेल एमडीएसचे मालक नितीन म्हात्रे यांच्या माध्यमातून देण्यात आली, तर ग्रासकटर ऑपरेटर निशिकांत दादा गावंड यांची मजुरी सारडे गावचे सरपंच रोशन पाटील यांच्या माध्यमातून देण्यात आली.या सामाजिक कार्या मध्ये ग्रासकटरसाठी लागणारे पेट्रोल विनोद पाटील, प्रा. अनिल नायडू, प्रा. प्रशांत म्हात्रे तसेच इंटपोर्ट ग्लोबल लॉजिस्टिक प्रा. लि.चे इम्पोर्ट मॅनेजर अमोल तेली यांच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात आले."निसर्ग संवर्धन ही काळाची गरज आहे आणि त्यासाठी योग्य वेळी योग्य पावले उचलली पाहिजेत." या विचाराने सारडे विकास मंचचे अध्यक्ष नागेंद्र म्हात्रे यांच्या पुढाकारातून गेली १४ वर्षे ही निसर्गसेवा अविरतपणे सुरू आहे. याच सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे आज कोमनादेवी परिसरात हिरवीगार वनराई आपल्याला पाहायला मिळत आहे.तर प्राध्यापक प्रशांत म्हात्रे यांनी या निसर्ग संवर्धनाच्या कार्यासाठी प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष सहकार्य करणाऱ्या सर्वांचे मनःपूर्वक आभार मानले. झाडे लावणे महत्त्वाचे आहेच; पण लावलेली झाडे वणव्यापासून वाचवणे त्याहून अधिक महत्त्वाचे आहे. निसर्ग वाचवा. वनराई जपा.भविष्यातील पिढीचे जीवन सुरक्षित करा!असा संदेश सारडे विकास मंच, उरण रायगड यांच्या वतीने देण्यात आला आहे.



श्री कालिंका देवी मंदिर येथे दर्शनासाठी भाविक भक्तांची गर्दी



सावळदबारा प्रतिनिधी : टिटवी गावाच्या डोंगराच्या मध्यभागी श्री कालिंका देवीचे मंदिर आहे. नवरात्रोत्सवामध्ये भाविक भक्त मोठ्या संख्येने दर्शनासाठी येथे येतात. हा परिसर डोंगर आहे. ११ ऑक्टोबरपासून नवरात्रोत्सवाला सुरुवात झाली आहे.

त्यानिमित्त मंदिर परिसरात विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. टिटवी गावाच्या डोंगराच्या मध्यभागी श्री कालिंका देवीचे मंदिर आहे. मंदिर टेकडीवर असून जवळपास बाराशे फूट खोल दरी आहे. त्यामुळे मंदिराच्या टेकडीला श्री कालिंका देवी मातेचा गड म्हणून ओळखले जाते. नवरात्रोत्सवामध्ये भाविक भक्त येथे दर्शनासाठी येतात. मंदिरावर विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. नवसाला पावणारी देवी म्हणून श्री कालिंका देवी प्रसिद्ध आहेत. या मंदिर परिसरात संपूर्ण डोंगराळ भाग आहे. श्री कालिंका देवी माता गडावर नवरात्रोत्सवानिमित्त भाविक भक्त दर्शनासाठी गर्दी करतात.

येथे गुढीपाडव्याच्या दिवशी श्री कालिंका देवीची मोठी यात्रा भरत असते. भाविक भक्त दर्शनासाठी व नवस फेडण्यासाठी येथे येतात. भाविक भक्त दर्शनासाठी येथे मोठ्या संख्येने येतात पिण्याच्या पाण्याची ,फराळची व्यवस्था करण्यात आली आहे संस्थानचे अध्यक्ष डॉ. अरुण पोफळे, उपाध्यक्ष कैलास अक्कर, सचिव प्रकाश अन्वेकर ,सावळदबारा सह परिसरातील देव्हारी, मोलखेडा, डाभा, देऊळगाव गुजरी, नांदातांडा, घाणेगाव, हिवरी, महालब्धा, पिंपळवाडी आदी गावांतील भाविक भक्त डोंगर चढून दर्शनासाठी जातात.

श्री कालिंका देवी मंदिर येथे दर्शनासाठी छत्रपती संभाजीनगर, जालना, बुलढाणा, जळगाव, सिल्लोड, सोयगाव, भोकरदन, जामनेर आदी ठिकाणांहून भाविक भक्त येथे येतात. टिटवी गावापासून डोंगराच्या मध्यभागी श्री कालिंका देवीचे मंदिर आहे. येथे दर्शन घेण्यासाठी टिटवी गावापासून डोंगरातून पायी चालत जावे लागते.

पायी दिंडीतील भाविकांचे भोलाने हॉस्पिटलतर्फे स्वागत

पायी दिंडीतील भाविकांची आरोग्य तपासणी



अजिंठा प्रतिनिधी : दरवर्षीप्रमाणे यंदाही सिल्लोड तालुक्यातील वांगी येथून वाकोद येथे साखरा देवी संस्थानाच्या दर्शनासाठी पायी दिंडीने जाणाऱ्या भाविकांचे गोळेगाव येथे स्वागत करण्यात आले. यावेळी भोलाने हॉस्पिटलच्या वतीने सुमारे २०० भाविकांची आरोग्य तपासणी करण्यात आली. तसेच भाविकांसाठी चहा व अल्पोपाहाराची व्यवस्था करण्यात आली. डॉ. प्रल्हाद भोलाने व पूजा भोलाने यांच्या पुढाकारातून दरवर्षी हा सामाजिक उपक्रम राबविण्यात येतो. पायी प्रवास करणाऱ्या भाविकांना प्रवासादरम्यान आरोग्यविषयक त्रास होऊ नये, तसेच त्यांना थोडा विसावा मिळावा, या उद्देशाने आरोग्य तपासणी व अल्पोपाहाराची व्यवस्था करण्यात आली. या उपक्रमामुळे पायी दिंडीत सहभागी झालेल्या भाविकांना दिलासा मिळाला. यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य गणेश बनकर यांच्यासह गावातील नागरिक उपस्थित होते. भाविकांच्या सेवेसाठी राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे कौतुक करण्यात आले.

'एक्सयूव्ही ३एक्सओ झेडएनजी बाजारात

मुंबई : भारतातील आघाडीची एसयूव्ही उत्पादक कंपनी महिंद्रा अँड महिंद्रा लिमिटेड हिने 'एक्सयूव्ही ३एक्सओ झेडएनजी' ही आपली पहिली सर्वसामान्य ग्राहकांसाठीची सीएनजी प्रवासी कार बाजारात आणली आहे. या गाडीची सुरुवातीची किंमत ९.९९ लाख रुपये (एक्स-शोरूम) आहे.

बोरीतील 14 निराधार नागरिकांच्या खात्यावर जमा होणार पगार

पालकमंत्री बोर्डीकरांच्या मार्गदर्शनाखाली कामांची पूर्तता

*बोरी,(प्रतिनिधी) - परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री नामदार सौ. मेघनाताई साकोरे बोर्डीकर व जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष मा.आ. रामप्रसादजी बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली मंजूर यादीतील लाभार्थ्यांच्या मूळ कागदपत्रांची पडताळणी पूर्ण झाली आहे. समितीचे अध्यक्ष डॉ. पंडितराव दराडे यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच बैठक झाली असून बोरी येथील 14 नागरिकांच्या खात्यावर लवकरच काही दिवसात निराधार योजनेची पगार पडणार असल्याचे निराधार समितीचे सदस्य श्री. गजानन चौधरी यांनी सांगितले.

जिंतूर तालुक्यातील बोरी येथील चौदा नागरिकांचा निराधार योजनेच्या मंजूर यादीत समावेश झालेला आहे. या नागरिकांना काही दिवसांपूर्वी पालकमंत्री नामदार सौ. मेघनाताई बोर्डीकर यांच्या स्वाक्षरीचे प्रमाणपत्र सुद्धा वाटप करण्यात आले. यामध्ये दिव्यांग, विधवा, परित्यक्ता, वर्धापकाळ आदी महिला व नागरिकांचा समावेश आहे. यानंतर निराधार समितीचे अध्यक्ष डॉ. पंडितराव दराडे,तहसीलदार श्रीमती शितल कच्छवे, नायब तहशीलदार प्रशांत राखे यांच्या सूचनेनुसार मंजूर यादीतील या सर्व लाभार्थी नागरिकांच्या मूळ कागदपत्रांची पडताळणी पूर्ण करण्यात आली. याकामी निराधार योजना समिती सदस्य श्री. गजानन चौधरी, श्री माधव राठोड, सौ. दिपाली ठाकूर, संतोषराव माने, श्री अंकुश बकान, श्री रामेश्वर पोंदाळ,श्री रवी रणबावळे, कार्यालय कर्मचारी दैवशाला कुऱ्हे,ए. एस. घुगे, शुभम आडके यांनी परिश्रम घेतले. पालकमंत्री नामदार सौ. मेघनाताई बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच समितीचे अध्यक्ष डॉ. पंडितराव दराडे यांच्या अध्यक्षतेखाली पुढील काही दिवसात बैठक होणार आहे. बोरी येथील त्रुटीच्या यादीतील नावे व नवीन लाभार्थी नावे यांच्या प्रक्रियेबद्दल चर्चा होणार असल्याचे बोरीचे निराधार योजना समिती सदस्य श्री. गजानन चौधरी यांनी सांगितले.

खेळ पैठणीचा स्पर्धेत निकिता अलंकार ठाकूर यांना प्रथम पारितोषिक

उरण दि १८ : शिवसेना प्रणित सार्वजनिक नवरात्रोत्सव मंडळ, चिरनेर रांजणपाडा यांच्या वतीने सालाबादप्रमाणे यंदाही आयोजित करण्यात आलेल्या 'खेळ पैठणीचा' या मनोरंजनात्मक स्पर्धेत निकिता अलंकार ठाकूर यांनी आपल्या उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले.

या स्पर्धेत निकिता अलंकार ठाकूर यांनी शेवटपर्यंत अत्यंत दर्जेदार प्रदर्शन करत अंतिम फेरीत प्रवेश केला. अंतिम फेरीतही आपली गुणवत्ता सिद्ध करत त्यांनी प्रथम पारितोषिकावर आपले नाव कोरले. स्पर्धेतील पहिल्या दोन क्रमांकांच्या विजेत्यांना विशेष पैठणी साड्या देऊन गौरविण्यात आले. तसेच स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व स्पर्धकांना मंडळाच्या वतीने उत्तेजनार्थ पारितोषिके देऊन



प्रोत्साहन देण्यात आले. या कार्यक्रमादरम्यान आयोजित करण्यात आलेल्या प्रश्नमंजुषा स्पर्धेलाही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. प्रश्नमंजुषेतील प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या स्पर्धकांना आकर्षक बक्षिसे देऊन सन्मानित करण्यात आले.

महिलांना आपल्या कलागुणांना वाव मिळावा, त्यांच्यातील आत्मविश्वास वाढावा आणि नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने आनंदाचे वातावरण निर्माण व्हावे, या उद्देशाने मंडळाच्या माध्यमातून दरवर्षी या कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. या उपक्रमामुळे महिलांना मनोरंजनासोबतच आपले कौशल्य दाखविण्याची संधी उपलब्ध होत आहे.

या संपूर्ण कार्यक्रमाचे प्रभावी आणि अचूक निवेदन जितेंद्र अंकुश ठाकूर व नीलेश बाळकृष्ण ठाकूर यांनी केले. त्यांच्या निवेदनामुळे कार्यक्रमात उत्साहपूर्ण वातावरण निर्माण झाले.

शिवसेना प्रणित सार्वजनिक नवरात्रोत्सव मंडळ, चिरनेर रांजणपाडा यांच्या या उपक्रमाचे परिसरातून कौतुक होत असून, अशा कार्यक्रमांमुळे नवरात्रोत्सवाचा आनंद द्विगुणित होत असल्याची भावना व्यक्त करण्यात येत आहे.

पदवीधर मतदारसंघ निवडणुकीसाठी 22 ऑक्टोबरला टपाली मतदानाची सुविधा

हिंदु प्रकाश वार्ता/प्रतिनिधी

परभणी : ०५-औरंगाबाद पदवीधर मतदारसंघ निवडणूक २०२६ च्या अनुषंगाने परभणी जिल्ह्यात निवडणूक कर्तव्यावर नियुक्त करण्यात आलेल्या पात्र अधिकारी व कर्मचाऱ्यांना टपाली मतपत्रिकेद्वारे मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी जिल्हा प्रशासनाच्या वतीने सुविधा केंद्र स्थापन करण्यात आले आहे. हे सुविधा केंद्र गुरुवार, दिनांक २२ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ८ ते दुपारी २ या वेळेत वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठातील कृषी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, परभणी येथे कार्यरत राहणार आहे. या केंद्रावर निवडणुकीच्या कामासाठी नियुक्त असलेल्या पात्र अधिकारी व कर्मचाऱ्यांना विहित प्रक्रियेनुसार टपाली मतपत्रिकेद्वारे मतदान करता येणार आहे. टपाली मतदान प्रक्रियेच्या वेळी निवडणूक लढविणारे उमेदवार किंवा त्यांचे अधिकृत मतदान प्रतिनिधी यांना नियमानुसार उपस्थित राहण्याची परवानगी असेल. निवडणूक कर्तव्यावर नियुक्त असलेल्या सर्व पात्र अधिकारी व कर्मचाऱ्यांनी निर्धारित वेळेत सुविधा केंद्रावर उपस्थित राहून आपल्या मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा ०५-औरंगाबाद पदवीधर मतदारसंघ निवडणूक २०२६ चे सहायक निवडणूक निर्णय अधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी केले आहे.



मोसम बर्डे यांचे निधन

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता/ प्रतिनिधी

सोयगाव,दि.१८ ऑक्टोबर - सोयगाव तालुक्यातील घोरकुंड येथील मोसम सांडू बर्डे (वय.६५)यांचे दि.१६ शुक्रवार मध्य रात्री १.०० वाजता निधन झाले.त्यांच्यावर सकाळी १.३० वाजता त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात पत्नी,दोन मुले,एक मुलगी,सुना,नातवंडे असा परिवार होत.पोलीस कर्मचारी राजू बर्डे यांचे ते वडील होत

मराठवाड्याच्या विकासातील बाबुरावजी काळे यांचे योगदान मोठे - द्वारकाभाऊ पाथ्रीकर

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

सोयगाव,दि.१८ ऑक्टोबर

द्वारकाभाऊ पाथ्रीकर यांनी अप्पासाहेबांच्या नेतृत्वाचे कौतुक केले.मराठवाड्याच्या विकासासाठी त्यांनी दिलेले योगदान मोठे असून, त्यांच्या नेतृत्वाची आठवण कायम राहील, असे मत त्यांनी व्यक्त केले.

अजिंठा शिक्षण संस्था संचालित पंडित जवाहरलाल नेहरू महाविद्यालय येथे थोर स्वातंत्र्यसेनानी, महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री, माजी खासदार, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे माजी उपाध्यक्ष तथा अजिंठा शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कै. बाबुरावजी काळे ऊर्फ अप्पासाहेब यांच्या स्मृतिदिनानिमित्त विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात मान्यवरांनी बाबुरावजी काळे यांच्या मराठवाड्याच्या विकासातील योगदानाला उजाळा दिला.

प्रा. डॉ. शेख मोहम्मद एजाज यांनी प्रमुख पाहुणे म्हणून कै. बाबुरावजी काळे यांचे 'मराठवाडा मुक्तिसंग्राम व राजकीय क्षेत्रातील योगदान' या विषयावर मार्गदर्शन करताना सांगितले की, बाबुरावजी काळे यांनी विद्यार्थिदशेपासूनच हैदराबाद मुक्तिसंग्रामात सहभाग घेतला. त्यांनी समाजातील विविध घटकांतील लोकांना मदत केली आणि अनेक कार्यकर्त्यांना सोबत घेऊन काम केले.

अप्पासाहेबांचे नेतृत्व प्रभावी होते. त्यांनी राजकीय क्षेत्रात विविध जबाबदाऱ्या सांभाळल्या. त्यांच्या नेतृत्वामुळे मराठवाड्याच्या विकासाला चालना मिळाली. मराठवाडा मुक्तिसंग्रामातील त्यांचे योगदान महत्त्वाचे होते. त्यांनी स्वामी रामानंद तीर्थ यांच्या कार्याचा संदर्भ देऊन अप्पासाहेबांच्या नेतृत्वाचे आणि सामाजिक कार्याचे महत्त्व स्पष्ट केले.

यानंतर डॉ. विनोद बोरसे यांनी 'मराठवाडा मुक्तिसंग्रामातील अप्पासाहेबांचे योगदान' या विषयावर विचार मांडताना बाबुरावजी काळे यांचे जन्मगाव असलेल्या खर्चाने येथे प्रत्यक्ष भेट देऊन तयार केलेली चित्रफीत दाखवून व्याख्यानाची सुरुवात केली. तसेच बाबुरावजी काळे यांनी सोयगाव येथे सहकाऱ्यांसमवेत केलेल्या सत्याग्रहाचा उल्लेख केला. तेथील पोलिस



मुक्तिसंग्रामाच्या विविध घटनांचा उल्लेख करत त्यांनी सोयगाव येथील झेंडा सत्याग्रह, विविध सभा, जंगल सत्याग्रह, शेंदुर्णी येथील शस्त्र प्रशिक्षण शिबिर आणि वाकोड येथील छावणी यांसारख्या उपक्रमांची माहिती दिली. निजामशाहीविरुद्धच्या आंदोलनात अनेक स्वातंत्र्यसैनिकांनी एकत्र येऊन सहभाग घेतल्याचे त्यांनी सांगितले. तसेच उपोषण, विविध नाक्यांवरील आंदोलने आणि हर्सल तुरुंगाशी संबंधित घटनांचाही त्यांनी उल्लेख केला.

अजिंठा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष रंगनाथ काळे यांनी अप्पासाहेबांच्या आठवणी सांगून मराठवाड्याच्या प्रगतीसाठी त्यांनी केलेल्या कार्याचा आढावा घेतला. सोयगाव येथे अप्पासाहेबांच्या नावाने ग्रंथालय उभारण्यात येईल, असे त्यांनी आपल्या मनोगतात सांगितले. सर्व वक्त्यांनी अप्पासाहेबांच्या कार्याविषयी सखोल विचार मांडल्याबद्दल त्यांनी त्यांचे आभार मानले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जालना जिल्ह्याचे माजी काँग्रेस अध्यक्ष व छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषदेचे माजी सदस्य ज्ञानेश्वर भांदरगे होते. प्रमुख पाहुणे म्हणून द्वारकाभाऊ पाथ्रीकर, हर्षचंद्र (बापू) लघाने, तुकाराम पाटील, सुभाष चौधरी, विलासचंद्र काबरा, अजिंठा शिक्षण संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. अशोक नाईकवाडे, डॉ. संजय मून, प्राचार्य डी. बी. चौधरी, गुलशन पवार, प्राचार्य डॉ. पंडित नलावडे, प्राचार्य डॉ. अन्वरसाब नरेगल, प्राचार्य डॉ. शिरीष पवार, उपप्राचार्य डॉ. रावसाहेब बारोटे, उपप्राचार्य रवी कुमार गोटेड, प्राचार्य डॉ. राजेश यादव, प्राचार्य डॉ. संभाजी वाघमारे

डॉ. एम. आर. खान, पंकज साबळे, जय सोने आदी उपस्थित होते.

अध्यक्षीय भाषणात ज्ञानेश्वर भांदरगे यांनी बाबुरावजी काळे यांच्याशी असलेल्या आपल्या आठवणी सांगितल्या. ते म्हणाले की, अप्पासाहेबांनी मला ओळख दिली आणि पुढे जाण्याची संधी दिली. आज मी जे काही यश मिळवले आहे, त्यामागे त्यांचे मार्गदर्शन आणि आशीर्वाद आहेत. त्यांनी मला स्वतःच्या मुलाप्रमाणे प्रेम दिले. बाबुरावजी काळे हे केवळ स्वतः काम करणारे नेते नव्हते, तर इतरांना घडवणारे नेते होते, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. शिल्पा जिवरग यांनी केले. प्राचार्य डॉ. पंडित नलावडे यांनी प्रास्ताविकात कार्यक्रमाची भूमिका स्पष्ट केली. बाबुरावजी काळे यांनी सामाजिक, आर्थिक आणि प्रादेशिक विकासासाठी केलेल्या कार्याची माहिती त्यांनी दिली. डॉ. दिलीप बिरुटे यांनी अप्पासाहेबांचा जीवनपट सादर केला. त्यांच्या संघर्षमय जीवनप्रवासातून मराठवाड्याच्या विकासासाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नांवर प्रकाश टाकला.

कार्यक्रमाच्या शेवटी प्रा. देवरे यांनी उपस्थित मान्यवर, वक्ते, प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचे आभार मानले. या कार्यक्रमासाठी पंडित जवाहरलाल नेहरू महाविद्यालय, संत ज्ञानेश्वर महाविद्यालय, सोयगाव, स्वर्गीय बाबुरावजी काळे महाविद्यालय, अजिंठा आणि स्वातंत्र्यसेनानी उत्तमरावजी पाटील नर्सिंग

दैनिक
हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

लाडसावंगी प्राथमिक आरोग्य केंद्राची सहसंचालक डॉ. अर्चना भोसले यांच्याकडून पाहणी



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : आरोग्य सेवा अधिक प्रभावी आणि गुणवत्तापूर्ण करण्याच्या दृष्टीने सहसंचालक डॉ. अर्चना भोसले यांनी १७ ऑक्टोबर रोजी लाडसावंगी येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला भेट देऊन विविध विभागांची पाहणी केली. यावेळी त्यांनी केंद्रात सुरू असलेल्या सीपीएचसी प्रशिक्षणाचा आढावा घेत प्रशिक्षक आणि प्रशिक्षणार्थींशी संवाद साधला.

प्रशिक्षणाच्या माध्यमातून दिले जाणारे मार्गदर्शन, प्रशिक्षणार्थींचा सहभाग आणि प्रशिक्षणाची अंमलबजावणी याबाबत डॉ. भोसले यांनी समाधान व्यक्त केले. तसेच आरोग्य सेवा अधिक दर्जेदार करण्यासाठी आवश्यक बाबींवर मार्गदर्शन करून संबंधितांना सूचना दिल्या.

उपलब्ध मनुष्यबळ आणि संसाधनांचा योग्य वापर करून रुग्णांना अधिक चांगल्या व लोकाभिमुख आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यावर त्यांनी भर दिला.

यावेळी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. प्रसन्न भाले, जिल्हा प्रशिक्षण वैद्यकीय अधिकारी डॉ. विखे पाटील, वैद्यकीय अधिकारी डॉ. मंडावले, प्रशिक्षण प्रमुख डॉ. रुक्षी भुमकर यांच्यासह आरोग्य केंद्रातील संबंधित कर्मचारी उपस्थित होते.

सरस्वती महोत्सवात विविध क्षेत्रांतील मान्यवरांचा गौरव

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : कै. प्रज्ञावंत आबासाहेब पाटील स्मृती विश्वामित्र सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने आयोजित 'सरस्वती महोत्सव' उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. प.पू. डॉ. रामचंद्र महाराज पारनेरकर आणि ॲड. विष्णू महाराज पारनेरकर यांच्या आशीर्वाद व प्रेरणेने आयोजित या महोत्सवात साहित्य, संगीत, क्रीडा आणि वाचनसंस्कृतीचा संगम अनुभवायला मिळाला. यावेळी ग्रंथ, साहित्य आणि वाचनालय क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या तीन मान्यवरांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

शिवराम प्रतिष्ठान, न्यू समर्थनगर येथे झालेल्या महोत्सवाची सुरुवात सरस्वती पूजन आणि गानसेवेने झाली. सौ. प्राजक्ता सुदामे, सौ. सोनिया कुलकर्णी, सौ. सोनम भाले आणि सौ. मुक्ता तळेकर यांनी गानसेवा सादर केली. सौ. सायली मालखरे यांनी निवेदन केले. यानिमित्ताने बुद्धिबळ स्पर्धेचेही आयोजन करण्यात आले होते.

पुरस्कार वितरण सोहळ्यास पूर्णवाद वर्धिष्णू प.पू. डॉ. श्री विष्णू महाराज पारनेरकर यांची उपस्थिती होती. जीवन कला मंडळाचे कार्याध्यक्ष आनंद मुठाळ अध्यक्षस्थानी होते, तर उद्योजक डॉ. नवरतनमल जैन प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. यावेळी डॉ. रामचंद्र महाराज पारनेरकर यांच्या साहित्याचा आढावा घेत त्यातील विचारांची आजच्या काळातील उपयुक्तता अधोरेखित करण्यात आली.

एमसीआरआय आयसीयूचे संचालक तसेच एमजीएम वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या औषधशास्त्र विभागातील सहयोगी प्राध्यापक डॉ. आनंद निकाळजे यांना



'डॉ. पारनेरकर महाराज स्मृती ग्रंथमित्र पुरस्कार' प्रदान करण्यात आला. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगातही अशा उपक्रमांसाठी पूर्णवाद परिवार एकत्र येऊन कार्यरत आहे, याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

लेखक, कादंबरीकार आणि साकेत प्रकाशन प्रा. लि.चे प्रकाशक बाबाजी भांड यांना 'डॉ. पारनेरकर महाराज स्मृती ग्रंथोपजीवी पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. सामान्य विद्यार्थी ते लेखक आणि प्रकाशक असा प्रवास त्यांनी आपल्या मनोगतातून उलगडला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक वाचनालय, जवाहर कॉलनीचे संस्थापक अध्यक्ष काशिनाथ कोंडीरामजी जाधव यांना 'डॉ. पारनेरकर महाराज स्मृती ग्रंथालय भूषण सेवाव्रती पुरस्कार' प्रदान करण्यात आला. त्यांच्या वतीने मुलगा सुबोध जाधव यांनी मनोगत व्यक्त करताना ग्रंथसेवेच्या कार्यात साथ देणाऱ्या सर्वांचे आभार मानले.

जीवन कला मंडळाचे कार्याध्यक्ष आनंद मुठाळ यांनी ग्रंथ ज्ञान देतात; मात्र ग्रंथांतील विचारांवर श्रद्धा निर्माण होण्यासाठी जीवनात गुरूंचे मार्गदर्शन आवश्यक असते, असे सांगितले. गुरूंच्या मार्गदर्शनातूनच ग्रंथांतील विचारांचा प्रत्यक्ष जीवनात उपयोग करता येतो, असेही त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौरभ मालखरे यांनी केले. रश्मी कुलकर्णी यांनी मान्यवरांचा परिचय करून दिला, तर राहुल दाशरथे यांनी प्रास्ताविक केले. पराग जोशी यांनी रामकवी रचित अभंग आणि काव्यगायन सादर केले. या महोत्सवातून ग्रंथप्रेम, वाचनसंस्कृती आणि ज्ञानसेवेचे महत्त्व अधोरेखित झाले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी कै. प्रज्ञावंत आबासाहेब पाटील स्मृती विश्वामित्र सार्वजनिक वाचनालय समितीने परिश्रम घेतले.

एमजीएम विद्यापीठात जागतिक अन्न दिनानिमित्त 'फूडनेक्स्ट 2026' उत्साहात

अन्नसुरक्षा, पोषण आणि अन्नप्रक्रिया उद्योगातील संधींविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : महात्मा गांधी मिशन (एमजीएम) विद्यापीठाच्या इन्स्टिट्यूट ऑफ बायोसायन्सेस अँड टेक्नॉलॉजीच्या वतीने जागतिक अन्न दिनानिमित्त १४ ते १७ ऑक्टोबरदरम्यान चार दिवसीय 'फूडनेक्स्ट २०२६' (FOOD-NEXT2026) महोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. या उपक्रमांतर्गत विविध स्पर्धा, औद्योगिक भेटी आणि तज्ज्ञांच्या व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले.

अन्नसुरक्षा, पोषण, अन्नप्रक्रिया तंत्रज्ञान, अन्नाची गुणवत्ता तसेच अन्न उद्योगातील रोजगार व उद्योजकतेच्या संधींबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करणे हा या उपक्रमाचा उद्देश होता. यानिमित्त पोस्टर सादरीकरण, खाद्यपदार्थ प्रदर्शन आणि अन्नविषयक चित्रफित निर्मिती स्पर्धा घेण्यात आल्या. या माध्यमातून विद्यार्थ्यांना वैज्ञानिक माहिती सर्जनशील पद्धतीने मांडण्याची आणि अन्नसुरक्षा व पोषणाबाबत जनजागृती करण्याची संधी मिळाली.

विद्यार्थ्यांना औद्योगिक कामकाजाचा प्रत्यक्ष अनुभव मिळावा, यासाठी छत्रपती संभाजीनगर येथील महानंदा डेअरी आणि गांधेली येथील



अन्न व दुग्धप्रक्रिया प्रकल्पाला भेटी देण्यात आल्या. यावेळी विद्यार्थ्यांनी दुग्धप्रक्रिया, अन्न उत्पादन, गुणवत्ता नियंत्रण, स्वच्छता आणि अन्नसुरक्षेविषयी माहिती घेतली.

चार दिवसांच्या कार्यक्रमात विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांची व्याख्याने झाली. महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राचे माजी प्रादेशिक अधिकारी सुदाम थोटे, विवेकानंद महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. अजित एस. खोजारे, ओमान येथील अन्नसुरक्षा व नियामक बाबींचे तज्ज्ञ डॉ. सय्यद खाजा आरिफुद्दीन, एस४एस टेक्नॉलॉजीजचे संशोधन व विकास विभागप्रमुख डॉ. स्वप्निल कोकाटे, अन्न व औषध प्रशासनाचे अन्नसुरक्षा अधिकारी फरीद सिद्दीकी, एमजीएम विद्यापीठाच्या इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड रिसर्चचे सहायक प्राध्यापक डॉ. हृषिकेश काकडे आणि अमरीन कादरी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

तज्ज्ञांनी उद्योजकता विकास, अन्नसुरक्षा नियम, संशोधन व विकास, गुणवत्ता व्यवस्थापन, आधुनिक तंत्रज्ञान आणि अन्न उद्योगातील करिअरच्या संधी यांवर प्रकाश टाकला. संवादात्मक सत्रांमुळे विद्यार्थ्यांना उद्योगक्षेत्रातील बदलत्या गरजा समजून घेण्यास मदत झाली.विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू प्रा. डॉ. विलास सपकाळ आणि कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

श्रेयनगरमध्ये श्री रेणुका माता आरती सोहळा उत्साहात

किशोरदादा शितोळे यांच्याकडून सामाजिक एकोपा आणि राष्ट्रीय एकात्मतेचे आवाहन

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : झांबड इस्टेट, श्रेयनगर येथे श्री रेणुका माता नवरात्र महोत्सवानिमित्त आयोजित आरती सोहळा भक्तिमय वातावरणात उत्साहात पार पडला. यावेळी भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष किशोरदादा शितोळे आणि सुप्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक मिलिंदजी बापट यांच्या हस्ते श्री रेणुका मातेची आरती करण्यात आली. परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून मातेचे दर्शन घेतले.

आरतीच्या वेळी मंदिर परिसरात भक्तिगीते आणि जयघोषाने वातावरण भक्तिमय



झाले होते. यावेळी उपस्थितांना संबोधित करताना किशोरदादा शितोळे यांनी सामाजिक एकोपा, बंधुभाव आणि राष्ट्रीय एकात्मतेचे महत्त्व अधोरेखित केले. जात, पात आणि धर्माचे भेद विसरून देशाच्या विकासासाठी सर्वांनी एकत्र यावे, असे आवाहन त्यांनी केले. देशाच्या प्रगतीसाठी सामाजिक सलोखा आणि राष्ट्रीय एकात्मता जपणे ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याचेही त्यांनी सांगितले.

नवरात्र महोत्सवानिमित्त मंदिर परिसरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, त्यांना भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

या आरती सोहळ्यास श्री रेणुका माता मंदिराचे विश्वस्त सतीशजी वैद्य, परिसराच्या नगरसेविका शिल्पाताई राणी वाडकर, सागरजी वाडकर यांच्यासह विविध मान्यवर, पदाधिकारी आणि भाविक उपस्थित होते.

पुनाडे येथील सरकारी जमिनीचा वापर स्थानिकांसाठी व्हावा, सदर जमीन स्वामीनारायण ट्रस्टला देण्याचा सरकारचा निर्णय दुर्दैवी

पंचायत समिती सदस्या कविता पाटील यांची आक्रमक भूमिका



उरण दि १८(विठ्ठल ममताबादे)उरण तालुक्यातील मौजे पुनाडे येथील ३७.५१५ हेक्टर म्हणजे ९२.७० एकर सरकारी जमीन बोचासनवासी श्री अक्षर पुरुषोत्तम स्वामीनारायण ट्रस्टला विश्वविद्यापीठ उभारण्यासाठी देण्याचा सरकारचा निर्णय दुर्दैवी असून सदर जमीन स्थानिकांच्या वापरांसाठी कायम रहावी यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करण्याची गरज असल्याचे भूमिका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उरण पंचायत समिती सदस्या कविता रूपेश पाटील यांनी पंचायत समितीच्या मासिक बैठकीत मांडत विरोधाचा ठराव घेण्याची सूचना केली.


मौजे पूनाडे हद्दीत सरकारी खराबा, आकारी पड, महाराष्ट्र राज्य सरकार, गुरचरण असा कब्जेदार तपशील असलेले सुमारे ११९.५९२ हेक्टर (२९५.५२ एकर) जमीन आहे. यापैकी अर्जदार स्वामिनारायण संस्थेने मौजे पुनाडे येथील सर्वे क्रमांक १/२७ व इतर येथील ११३.८६२ हेक्टर जमिनीपैकी वाटपास उपलब्ध असलेल्या ३७.५१५ हेक्टर जागेची मागणी केली होती. १३.६०५ हेक्टर गुरचरणाखालील , ७.२१२ हेक्टर धरणाकडील व ५५.५३ हेक्टर वनविभागाकडील अशी वाटपास उपलब्ध असलेली ३७.५१५ हेक्टर जमीन आहे. सदर जमीन सलग स्वरूपात आहे किंवा कसे याबाबत पडताळणी करण्यात यावी व तसा तपशील शासनास सादर करण्याबाबत व वरील सर्व क्षेत्राची शासकीय मोजणी करण्याचे पत्र संदीपान देवणे कक्ष अधिकारी महाराष्ट्र शासन यांनी दिनांक ०६ ऑक्टोबर २०२५ रोजी जिल्हाधिकारी रायगड यांना दिले होते. यानुसार येथे शासकीय मोजणीस आलेल्यांना पुनाडे ग्रामस्थांनी विरोध दर्शवला होता. ग्रामस्थांच्या विरोधाला न जुमानता पोलीस बंदोबस्तात मोजणी करण्यात आली. व पुढील कार्यवाही सुरू आहे. विश्वविद्यालय उभारण्यासाठी स्वामीनारायण संस्था राज्य सरकारकडे जागेची मागणी करते आणि राज्य सरकारही जलद गतीने प्रतिसाद देत आवश्यक ते सोपस्कार पार पाडत आहे हे अविश्वसनीय आहे. कविता रूपेश पाटील यांनी आमच्या प्रातिनिधिशी बोलताना सांगितले की महसूल विभागाने या जमिनीचा वापर येथील स्थानिकांना भविष्यात काय कसा करता येऊ शकतो याचा विचार करणे गरजेचे होते.

सारडे गावातील सर्व घरांना प्रॉपर्टी कार्ड द्या; केवळ मूळ गावठाणाचे सर्वेक्षण करू नका!

सामाजिक कार्यकर्ते मनोज कृष्णा पाटील यांचे ग्रामस्थ, रहिवासी आणि ग्रामपंचायतींना आवाहन

उरण दि. १८ (विठ्ठल ममताबादे) उरण तालुक्यातील गावठाण विस्ताराचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून, गावातील सर्व घरांना प्रॉपर्टी कार्ड मिळावे, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते व गावठाण विस्ताराचे अभ्यासक मनोज कृष्णा पाटील यांनी केली आहे. केवळ मूळ गावठाणातील घरांचे सर्वेक्षण करून विस्तारित गावठाणातील घरांना वगळण्यात येऊ नये, यासाठी ग्रामस्थ, रहिवासी, ग्रामपंचायती आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी वेळीच भूमिका मांडावी, असे आवाहन त्यांनी केले आहे.

उरण पंचायत समिती येथे तालुक्यातील ग्रामपंचायतींच्या उपस्थितीत जिल्हा भू-अभिलेख अधीक्षकांची बैठक झाली. या बैठकीत १९६६ मध्ये मान्यता मिळालेल्या मूळ गावठाणातील घरांचे सर्वेक्षण करून त्यांना सनद अर्थात प्रॉपर्टी कार्ड देण्याबाबत माहिती देण्यात आल्याचे समजते. मात्र, या प्रक्रियेत विस्तारित गावठाणातील घरांचाही समावेश होणार का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.



मनोज पाटील यांच्या म्हणण्यानुसार, ब्रिटिश काळात १९३२ मध्ये गावठाणाची मोजणी करण्यात आली होती, तर १९६६ मध्ये महाराष्ट्र राज्यात मूळ गावठाणाला मान्यता मिळाली. त्यानंतर लोकसंख्या वाढ, कुटुंबांचा विस्तार आणि नैसर्गिक वाढीमुळे गावांचा विस्तार झाला. मात्र, विस्तारित गावठाणातील घरांचा प्रश्न अद्यापही प्रलंबित असल्याचे त्यांनी नमूद केले.

उरण तालुक्यातील सारडे गावातील गावठाणाचा प्रश्न महत्त्वाचा असून सारडे गावाचे उदाहरण देताना पाटील यांनी सांगितले की, गावाचे मूळ गावठाण सुमारे ९ एकर असून विस्तारित गावाचा परिसर सुमारे ९८ एकर आहे. ग्रामस्थ आणि रहिवाशांनी गावाची मोजणी करून दोन प्रस्ताव जिल्हा भू-अभिलेख कार्यालयाकडे सादर केल्याचेही त्यांनी सांगितले. त्यामुळे केवळ मूळ गावठाणातील घरांचे सर्वेक्षण करण्याऐवजी विस्तारित गावातील घरांचाही विचार करून संपूर्ण गावाला गावठाणाचा दर्जा देण्याची आणि सर्व घरांना प्रॉपर्टी कार्ड उपलब्ध करून देण्याची मागणी त्यांनी केली आहे.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (MMRDA) नियोजनामुळे गावठाणाच्या हद्दीबाबत निर्माण होणाऱ्या प्रश्नांकडेही त्यांनी लक्ष वेधले. दर दहा वर्षांनी गावठाणाचा २०० मीटरने विस्तार करण्याच्या मागणीवर अद्याप अपेक्षित कार्यवाही झालेली नसल्याचे त्यांचे म्हणणे आहे. पाच दशकांच्या कालावधीचा विचार करता प्रत्येक गावाच्या गावठाण विस्ताराचा प्रश्न गांभीर्याने सोडविण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी नमूद केले.

ग्रामपंचायतींनी सर्व घरांच्या हक्कांसाठी भूमिका घ्यावी.अशी भूमिका मनोज पाटील यांनी घेतली.काही ग्रामपंचायतींनी केवळ मूळ गावठाणातील घरांच्या मोजणीला मान्यता दिल्याचे समजत असल्याचे सांगून, अशा निर्णयांचा विस्तारित गावातील रहिवाशांवर काय परिणाम होईल, याचा विचार करण्याची गरज पाटील यांनी व्यक्त केली. मूळ गावठाणातील घरांना प्रॉपर्टी कार्ड देण्याच्या प्रक्रियेला विरोध करण्याऐवजी, विस्तारित गावातील घरांनाही त्याचा लाभ मिळेल, याची खात्री करावी, असे त्यांनी स्पष्ट केले.

"केवळ मूळ गावठाणाचे सर्वेक्षण करून विस्तारित गावातील घरांना वगळू नये. ग्रामपंचायतींनी संपूर्ण गावाच्या हिताचा विचार करून सर्व घरांच्या सर्वेक्षणाची आणि प्रॉपर्टी कार्डची मागणी करावी. ग्रामस्थांनीही या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देऊन आपल्या हक्कांसाठी वेळेत आवाज उठवावा," असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते व गावठाण विस्ताराचे अभ्यासक मनोज कृष्णा पाटील यांनी केले आहे.

सागरीकन्या सृष्टी मुंबईकर झाली " नवदुर्गा पुरस्काराने " सन्मानित !



उरण दि १८(विठ्ठल ममताबादे)महिलांच्या अंगभूत कौशल्याचा त्यांच्या संघर्षमय प्रवासाचा सन्मान करणारा आणि नव्या पिढीला प्रेरणेची दिशा देणारा " नवदुर्गा सन्मान सोहळा २०२६ " उरण येथील गुरुकुल ॲकॅडमी,आधार फाऊंडेशन सार्वजनिक नवरात्र उत्सव २०२६ यांच्या सौजन्याने या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमात विविध क्षेत्रात आपल कर्तुत्व सिद्ध करून समाजाच्या उन्नतीसाठी आपला वेळ, ऊर्जा, आणि नेतृत्व समर्पित करणाऱ्या महिलां भगिनींचा अर्थात नवदुर्गांचा सन्मान करण्यात आला त्यात रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्याची शान आणि वेश्वी गावाचा अभिमान आगरी लेक सागरी कन्या कुमारी सृष्टी राजश्री राजेंद्र मुंबईकर ही मेरीटाईम क्षेत्रातील मर्चंड नेव्ही मध्ये जागतिक दर्जाच्या मर्क्स कंपनीने १३५ वर्षां नंतर पहिल्यांदाच मुलींना प्राधान्य देण्यात आले.आणि त्यात संपूर्ण देशभरातून तब्बल ४,५०० मुलीं मधून ३९ मुलींना निवडण्यात आले त्यात अथांग सागराला गवसणी घालत आपल्या कवेत सामावून घेणारी रायगडची सागरी कन्या सृष्टी मुंबईकर हिची निवड करण्यात आली.अश्या ह्या सागराला गवसणी घालणारं कर्तृत्व आणि त्यातून मिळालेलं अभूतपूर्व यश संपादन करून जागतीक दर्जाच्या मर्क्स कंपनीच्या समुद्री जहाजावर गेल्या दोन वर्षांच्या कालावधीत आपली कार्यकालीन ड्युटी बजावताना आत्ता पर्यंत चायना, हाँगकाँग, सिंगापूर,मलेशिया,व्हिएतनाम, आफ्रिका, युरोप, लंडन ,अमेरिका न्यूयॉर्क अश्या अनेक देशांची भ्रमंती करून सध्या अमेरिका न्यूयॉर्क येथे आपली ड्युटी बजावत आहे आणि म्हणुनच सृष्टी मुंबईकर हिच्या ह्या कर्तृत्ववान उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन उरण नगर परिषदेच्या नवनिर्वाचित कर्तव्यदक्ष नगराध्यक्षा भावनाताई घाणेकर यांच्या पुढाकारातून गुरुकुल ॲकॅडमी तसेच आधार सावली फाऊंडेशन सार्वजनिक नवरात्र उत्सव यांच्या सौजन्याने " नवदुर्गा सन्मान २०२६ " हा मानाचा पुरस्कार शाल ,श्रीफळ आणि सन्मानचिन्ह देऊन खऱ्या अर्थाने ह्या नवदुर्गेचा सन्मान करण्यात आला. सृष्टी मुंबईकर हिच्या वतीने तिचे आई बाबा राजू मुंबईकर आणि राणीताई मुंबईकर यांनी पुरस्कार स्वीकारून समाजात आपलं आयुष्य स्थान निर्माण करणाऱ्या आपल्या लेकीच्या कर्तुत्वाला सलाम केला.हा सोहळा केवळ पुरस्कार सोहळा नसून महिलां भगिनींच्या संघर्षांला आणि यशाला दीलेली कौतुकाची थाप होती.अनेक मान्यवर मंडळींच्या उपस्थितीत पार पडलेला हा कौतुक सोहळा संपन्न झाला.

पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठीय बुद्धिबळ स्पर्धेत संत ज्ञानेश्वर महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींना रौप्यपदक

मुलींच्या बुद्धिबळ संघाची सलग तीन वर्षांपासून पदकांची परंपरा कायम

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता/ प्रतिनिधी

सोयगाव,दि.१८ ऑक्टोबर

पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठीय बुद्धिबळ स्पर्धेत संत ज्ञानेश्वर महाविद्यालय सोयगाव येथील विद्यार्थिनींनी उल्लेखनीय कामगिरी करत रौप्यपदक प्राप्त केले.या यशामुळे महाविद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.या स्पर्धेत महाविद्यालयाच्या कु.संस्कृती वानखेडे आणि कु.सानिया तडवी यांनी चमकदार कामगिरी करत महाविद्यालयाचा नावलौकिक वाढविला.विशेष अभिमानाची बाब म्हणजे,संत ज्ञानेश्वर महाविद्यालयाच्या मुलींच्या बुद्धिबळ संघाने गेल्या तीन वर्षांपासून आंतरविद्यापीठीय स्पर्धांमध्ये सातत्याने पदकांची कमाई केली आहे.या सातत्यपूर्ण



यशामुळे महाविद्यालयाची क्रीडा क्षेत्रातील परंपरा अधिक बळकट झाली आहे.विद्यार्थिनींची मेहनत,जिद्द,चिकाटी आणि योग्य मार्गदर्शन यांमुळे हे यश संपादन करणे शक्य झाले.

या यशस्वी विद्यार्थिनींना महाविद्यालयाचे क्रीडा विभागप्रमुख डॉ.निलेश गाडेकर यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थिनींनी सराव आणि स्पर्धेतील कामगिरीच्या जोरावर हे यश मिळविले.

या उल्लेखनीय यशाबद्दल अजिंठा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष रंगनाथ काळे,सचिव प्रकाश काळे,महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिरीष पवार,उपप्राचार्य डॉ.रावसाहेब बारोटे,कार्यालयीन अधीक्षक पंकज साबळे तसेच संस्थेतील पदाधिकारी आणि महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी दोन्ही विद्यार्थिनींचे अभिनंदन केले आणि त्यांच्या पुढील क्रीडा वाटचालीस शुभेच्छा दिल्या. संत ज्ञानेश्वर महाविद्यालयाने क्रीडा क्षेत्रातील आपली यशस्वी परंपरा कायम राखत पुन्हा एकदा महाविद्यालयाचा गौरव वाढविला आहे.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911